बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

## रक्ताच्या सह्याचे निवेदन

तलवाडा:लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानीमीत्त विभागीय आयुक्त कार्यालय येथे लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी देण्यात यावी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावे या संबंधित धरणे आंदोलन करून आयुक्तांना रक्ताच्या सह्याचे निवेदन देण्यात आले यावेळी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राधाजी शेळके ,जिजाबाई शेळके, भंडारी शिवाजी, शिव शेळके, गणपत कांबळे, विनायक वाघोले, महादेव घनगाव, शंकर पवार ,अंकुश कांबळे ,रमेश दाभाडे ,बाबासाहेब पाटोळे, एमडी वावळे, दादाराव रोकडे, काशीबाई शिरवडे, शेषाबाई शिरवडे, गणेश घोडे, सर्जेराव पाटोळे, शरद चव्हाण, सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते

बीड | शनिवार,दि.२०जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३५६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

महाराष्ट्राच्या एकतेला सुरुंग लावणारे हात कोणाचे ?

# मुस्लिम समाज जाणीवपूर्वक टार्गेट का?

- बीडमध्ये मुस्लिम बांधवांचे शांततेत आंदोलन
- काही ठिकाणी धरणे तर कुठे काळ्या फिती लावून निषेध
- बीडमध्ये सर्वच समाज मुस्लिम बांधवांच्या आंदोलनात सहभागी
- अराजकता माजविणारे शोधून काढात योग्य कारवाई करा



बीड/पुण्यभूमी टीम

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड आणि गजापूर गावात समाजकंटकांनी केलेल्या भ्याड हल्लूयाच्या व हिंसाचार प्रकरणी निषेध व्यक्त करण्यासाठी बीड जिल्हाभर सकल मुस्लिम समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चे, धरणे, आंदोलने करीत सरकारचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला.या आंदोलनात मुस्लिम समाज बांधवांसोबत सर्वच जाती-धर्मांची माणसे सहभागी झाली होती.

बीडमध्ये काढण्यात आलेल्या आंदोलनात, गजापूर येथील दर्गा आणि मुस्लिम समाजातील अनेक घरांवर केलेल्या हल्लूयाच्या निषेध करण्यात आला यामध्ये मुस्लिम बांधवांनी आपल्या हातावर काळी पट्टी बांधून जाहीर निषेध व्यक्त केला. या निवेदनात प्रमुख मागण्या होते की, सदर घटना पूर्वनियोजित असून वरील गुन्हे करणाऱ्या आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोरात कठोर शिक्षा करावी. मोर्चाचे आयोजन करणाऱ्या स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे व इतर पदाधिकारी, पुण्यातील रविंद्र पडवळ, अनेक गुन्हे दाखल असलेला आरोपी हिंदू राष्ट्र सेनेचा प्रमुख धनंजय देसाई यांच्यावर गुन्हे दाखल करावेत व त्यांना ताबडतोब अटक करावी. झालेल्या हिंसाचारात ज्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई द्यावी. जी शेकडो वर्षापासून प्रार्थना स्थळे आहेत त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था शासनाने करावी.मुस्लिम समाजावर कोल्हापुरात व महाराष्ट्रात सतत होणाऱ्या अत्याचाराविरोधात पोलीस अधीक्षक यांच्या द्वारे प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक अत्याचार प्रतिबंधक समिती स्थापन करावी व तिची अंमलबजावणी प्रत्येक जिल्ह्यात करावी.सोशल मीडियात मुस्लिम समाजाबद्दल आणि त्यांच्या अस्थेशी जोडलेल्या धार्मिक स्थळाबद्दल व्हिडीओ बनवणाऱ्या आणि धार्मिक भावना दुखवणाऱ्या मंडळीवर कायदेशीर कारवाई करावी.या मोर्चात कुठलाही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.






### काळ्या फिती बांधून शांततेत रॅली

गाजापुर (विशाळगड) येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ काल तलवाड्याचे सकल मुस्लिम बांधवांच्या वतीने बंद चे आव्हान करण्यात आले होते मुस्लिम बांधवांच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशन यांच्या मार्फत राज्य शासनाला निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड ,निवेदन पाठवण्यात आले आहे. यावेळी तलवाडा पंचक्रोशीत सर्व व्यापारी बांधवांनी आपले दुकाने बंद ठेवून जाहीर पाठिंबा दिल्या बद्दल सकल मुस्लिम बांधवांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले आणी समाज कटकावर कडक कारवाई करण्याची मागणी केली

**पोलीसांची करडी नजर:** कोणत्याही समाजातील व्यक्तीने दोन समाजात तेढ निर्माण होण्यासारखे इस्टग्राम ,फेसबुक, व्हाट्सअप ग्रुप वर किंवा स्टेटस ठेवणे जेणेकरून समाजाचे मन दुखवेल अशी कुणीतेही पोस्ट करू नये या सर्व सोशल मीडियावर पोलिसांची कडी नजर असते कुणीही पोस्ट आक्षेपार्ह केली तर त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल व गुन्हा दाखल करण्यात येईल असे आव्हान सपोनि सोमनाथ नरके यांनी केले आहे.

### सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

तलवाडा : मुस्लीम समाजाच्या भावना दुखावतील अशा ताल पध्दतीची पोस्ट तयार करून सोशल मिडियावर व्हायरल केल्याचा प्रकार दिं.१९ रोजी दुपारी उघडकीस आला आहे. या प्रकरणी गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाण्यात शेख तैमुर शेख अफसर यांच्या फिर्यादीवरून ओमकार संतराम उबाळे, आणि नितीन बाबासाहेब उबाळे ,(रा. नंदपुर कांबी ता. गेवराई) यांच्याविरूध्द कलम २९९, ३ (५) भारतीय न्याय संहितेप्रमाणे तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन आरोपींच्या अटकेसाठी पथक रवाना झाल्याचे सपोनि सोमनाथ नरके, यांनी सांगितले

## हजारो समाज बांधवांनी एकत्र येत केला निषेध

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसिल कार्यालय परिसर समाज बांधवांनी दणाणुन सोडत गजापुर येथे झालेल्या अमानुष हल्लयाचा तिर्व शब्दात निषेध व्यक्त करुन या हल्लूयात नुकसान ग्रस्त लोकांना तात्काळ मदत करुन घटनेला जबाबदार दहशतवादांना अटक करुन न्याय द्यावा या मागणीचे निवेदन हजारो बांधवाच्या साक्षिने तहसिलदार संदिप खोमने यांना देण्यात आले तसेच त्यांच्या मार्फत राज्यपाल मुख्यमंत्री यांना पाठवले आहे.

यावेळी मुफ्ती मोईनुद्दीन कासमी,मौलाना शब्बीर सहाब,मुफ्ती युनुस सहाब,मुफ्ती गयाज,माजी.जि.प अध्यक्ष विजयसिंह पंडित,माजी जि.प.सभापती युद्धाजित पंडित,युवा नेते शिवराज पवार,मराठा समन्वयक महेश दाभाडे,मनसे जिल्हा प्रमुख राजेंद्र मोटे,यशराज पंडित,नगरसेवक जानमोहंमद बागवान,मोमीन मौज्ज़म ,मंजुर बागवान,याहिया खान,फेरोज सेठ , ऋषिकेश बेदरे, विनोद शेठ सौदंरमल, शेख खाजा ,सय्यद एजाज, शेख बब्बू, शोहेब अत्तार महेश बेदरे,दलित नेते धम्मापाल कांडेकर, रिपाईचे किशोर कांडेकर,विलास सुतार, माऊली गंगाधर,अँड.निकम,रोहित पंडित,श्रीनिवास बेदरे,शाहरुख पठाण,वसीम फारोकी,सय्यद नजीब,उस्मान शेख,सभापती मुजीब पठाण ,उपसरपंच हिरापुर अमजद पठाण,शेख अमजद ,हारुण तांबोळी ,सय्यद शहेदाद,जुनेद बागवान,अनसार शेख,सरवर पठाण,शौकत पठाण,वाजीद तांबोली,आवेज शरीफ,शौकत सौदागर,शेख नविद अलीम शेख यांनी तहसिलदार यांना निवेदन देत तिर्व निषेध नोंदवला आहे.

# बीड रेल्वेच्या समस्या लवकरच मार्गी

**दिलासा** | पंकजाताई मुंडेंनी घेतली रेल्वे मंत्र्यांची भेट

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आ. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन परळी व बीड जिल्ह्यातील रेल्वेच्या समस्या त्यांचेसमोर मांडल्या. परळीतील जमीन अधिग्रहणासह जिल्ह्यातील रेल्वेविषयक प्रश्नांची लवकरच सोडवणूक करू असं आश्वासन त्यांनी दिलं. जिल्हयाचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे हे देखील यावेळी उपस्थित होते.

भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव गुरूवारी मुंबईत आले होते. भाजपच्या प्रदेश कार्यालयात आ. पंकजाताई मुंडे, पालकमंत्री धनंजय मुंडे व परळीच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली परळी येथील रेल्वेच्या जमीन अधिग्रहणासह विविध मागण्यांचे निवेदन यावेळी त्यांना देण्यात आले. पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांनी सविस्तरपणे सगळे विषय त्यांचेसमोर मांडले.

या सर्व मागण्यांवर योग्य तो विचार करून परळी वैजनाथ, बीड येथील रेल्वेचे रखडलेले प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, असा विश्वास केंद्रीय रेल्वेमंत्री श्री.अश्विनी वैष्णवजी यांनी यावेळी दिला. दरम्यान, या भेटीत सुरवातीला पंकजाताई मुंडे यांनी श्री.अश्विनी वैष्णव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत निरोगी आणि उदंड दीर्घायुष्य लाभावे अशी सदिच्छा व्यक्त केली.





## बीडमध्ये होणार पवित्र इज्तेमा

**धार्मिक:** डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली जागेची पाहणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरात येत्या रविवारी मर्कज मस्जिदमध्ये मुस्लिम बांधवांचा इज्तेमा पार पडणार आहे. याअनुषंगाने नियोजित जागेची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१९) पाहणी केली.

शहरातील राजुरी वेस परिसरात विविध कार्यासाठी नियोजित करण्यात आलेल्या जागेत आयोजकांकडून काही मागण्या करण्यात आल्या होत्या.

प्रशासनामार्फत आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जागेची पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक सय्यद इलियास, उबेद खान, शेख वाजेद, शेख जमील, सलिम अध्यक्ष, इम्रान अत्तर, अहमद चाउस, जुनेद शेख, सादेक शेख आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्राची ‘माती’कला!

दक्षिण आफ्रिकेत हिंदी बांधवांसाठी मोहनदास करमचंद गांधी काही करू पाहत असताना त्यांच्या चळवळीसाठी निधीची गरज लागली, तेव्हा पुण्यातून गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या ब्रिटिश प्रकाशकास स्वत:च्या मानधनातून निधी देण्यास सांगितले. त्याने केवळ १०० रुपये पाठवल्यावर रागावलेल्या गोखले यांनी त्यास लिहिले : ‘‘माझ्या खात्यात फक्त सात हजार रुपये आहेत; तरी मी त्यातील हजारभर दिले आणि वेळ आल्यास सगळेच्या सगळे देईन.’’ हे असे नेक नामदार गोखले हे महात्मा गांधींचे गुरू. देश निर्मितीसाठी आवश्यक बुद्धिमान, नेक कार्यकर्ते घडवावेत या हेतूने ना. गोखले यांनी १९०५ साली ‘सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी’ची स्थापना केली. त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखणाऱ्या पहिल्या काहींत जमशेटजी टाटा यांचे कनिष्ठ पुत्र सर रतन टाटा यांचा समावेश होता आणि त्यांनी ना. गोखले यांच्या कार्यास आर्थिक पाठिंबाही दिला होता. दुर्दैवाने ना. गोखले अकाली गेले. त्यांच्या स्मरणार्थ सर रावबहादूर काळे यांनी पुण्यात १९३० साली ‘गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स’ या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली आणि विख्यात अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या हाती तिची धुरा सोपवली. तेव्हापासून या संस्थेने भारतीय अर्थशास्त्र, अर्थविज्ञान आणि यांच्या आधारे अर्थनियोजनार्थ जे कार्य केले त्यास तोड नाही. स्वत: गाडगीळ, वि. म. दांडेकर, नीलकंठ रथ आदी उच्च दर्जाच्या अर्थवेत्त्यांनी या संस्थेस बौद्धिक नेतृत्व दिले. प्रगती, गरिबी ते अनुशेष अशा विविध घटकांच्या मापनाचे शास्त्रशुद्ध मापदंड निश्चित करण्यात या मंडळींचा मोठा वाटा होता. त्याचमुळे महाराष्ट्रातील निखळ बौद्धिक संस्थांत तिची गणना होते. या संस्थेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या ‘काळे स्मृती व्याख्यानमाले’त आपली बुद्धिसेवा सादर करणाऱ्यांच्या नावावर नजर टाकली तरी या संस्थेचे ‘असणे’ किती मौल्यवान आहे हे कळावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जॉन मथाई, चिंतामणराव देशमुख, द. गो कर्वे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पी. सी. महालनोबीस, वि. म. दांडेकर, आय. जी. पटेल, मे. पुं. रेगे, मनमोहन सिंग, व्हर्गीस कुरियन, जगदीश भगवती, रघुराम राजन आदी किती नावे सांगावीत! समग्र महाराष्ट्रास अभिमान वाटावा अशी ही संस्था आज दुर्दैवाने भलत्याच कारणांसाठी चर्चेत आहे.या संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांना अस्थिर करण्याचे प्रयत्न हे ते कारण. अन्य अनेक विद्यापीठांच्या कुलगुरूंप्रमाणे डॉ. रानडे यांस हे पद कोणाच्या चिठ्ठीचपाटीने वा सत्ताधाऱ्यांच्या वैचारिक कुलपीठाकडून आलेल्या शिफारशीने मिळालेले नाही. तसेच हे पद मिळाल्याने डॉ. रानडे अधिक मोठे होतात असेही नाही. हे पद मिळण्याआधीही डॉ. रानडे यांचा लौकिक सर्वदूर होता आणि पंतप्रधानांस केंद्रीय पातळीवर ज्यांचे म्हणणे ऐकावे असे वाटते अशांमध्ये त्यांची गणना होती आणि अजूनही आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात सध्या ज्यांचे अमाप पीक आलेले आहे अशा सत्तापदस्थांस लोंबकळत राहणाऱ्या खटपटखोरांत डॉ. रानडे यांची गणना होऊ शकत नाही. ज्यांची सत्ता, त्यांच्या रंगाच्या टोप्या घालून मिरवणाऱ्यांची संख्या या प्रांतात कमी नाही. डॉ. रानडे यांस अशा कोणत्याच रंगाची टोपी घालण्यात रस नाही. या टोपी घालणाऱ्यांच्या संस्कृतीमुळे होते काय तर त्या टोपीखालच्या डोक्यात काय आहे, काय नाही यापेक्षा त्या टोपीच्या रंगावरच ती घालणाऱ्याचे वर्गीकरण केले जाते आणि टोपीवाल्यांच्या झुंडी तयार होतात. या झुंडीस घाबरून अनेक जण त्या त्या काळात चलती असलेल्या रंगांच्या टोप्या डकवण्यास आपली डोकी देतात. अशा वातावरणात अशी कोणत्याही रंगाची टोपी घालण्यास नकार देणे हा तसा गुन्हाच. तो डॉ. रानडे यांनी निश्चित केला असणार. त्यामुळे नेमणुकीस दोन वर्षे झाल्यानंतर ते या पदास किती अपात्र आहेत वगैरे चर्चा सुरू होते. तिचा स्तर पाहिला की महाराष्ट्राची बौद्धिक अधोगती किती झपाट्याने सुरू आहे हे लक्षात येईल.हे वास्तव गोखले संस्थेचे महत्त्व अधिकच अधोरेखित करते. इतिहास असा की इंग्रजांकडून होणाऱ्या आर्थिक शोषणाचा मुद्दा आणि त्याचे मोजमाप पहिल्यांदा बाळशास्त्री जांभेकर यांसारख्यांनी केले आणि दादाभाई नवरोजीसारख्यांनी तो मुद्दा पुढे रेटला. ना. गोखले हे मराठी मातीशी नाते टिकविणाऱ्या न्या. रानडे, न्या. तेलंग, आगरकर, टिळक, डॉ. आंबेडकर अशा तेज:पुंज विद्वानांच्या माळेतील एक. अशा विद्वानांचे निपजणे अलीकडे दुरापास्त झालेले असताना आणि अशी संस्था उभारणीही इतिहासजमा होत असताना आहे ते जपता न येण्याचा कृतघ्नपणा महाराष्ट्राने- आणि तोही पुण्यात- करू नये. बुद्धिवंतांस आकार देणारी ‘मूर्ति’कला हे या मातीचे मोठेपण. महाराष्ट्राचे रूपांतर बुद्धिवंतांची माती करणाऱ्यांत होऊ नये.

# जर्मनीच्या पहिल्या महिला चॅन्सलर अँजेला मर्केल!



१८६७ मध्ये उत्तर जर्मन कॉन्फेडरेशनमध्ये कार्यालयाची निर्मिती करण्यात आली , जेव्हा ओटो फॉन बिस्मार्क पहिले जर्मनीचे कुलपती झाले.१८७१ मध्ये जर्मनीचे एकीकरण आणि जर्मन साम्राज्याच्या स्थापनेसह , कॉन्फेडरेशन जर्मन राष्ट्र-राज्यात विकसित झाले आणि त्याचे नेते जर्मनीचे कुलपती म्हणून ओळखले जाऊ लागले. मूलतः कुलपती हा केवळ सम्राटाला जबाबदार होता . १९१८ मध्ये घटनात्मक सुधारणेसह हे बदलले, जेव्हा संसदेला कुलपतीला बडतर्फ करण्याचा अधिकार देण्यात आला.१९१९ वायमर राज्यघटनेनुसार कुलपतींची नियुक्ती थेट निवडून आलेल्या राष्ट्रपतींद्वारे करण्यात आली होती , परंतु ते संसदेला जबाबदार होते.

पहिले महायुद्ध सुरू असताना हिंडेनबर्ग हे जर्मनीचे अध्यक्ष होते. पॉल फॉन हिंडेनबर्ग ३० जानेवारी , १९३३ मध्ये जर्मनीचे अध्यक्ष असताना हिंडेनबर्ग यांनी हिटलरला मंत्रिमंडळातील सर्वोच्च पद चॅन्सेलरशिपची ऑफर दिली आणि डॉल्फ हिटलरला जर्मनीच्या चॅन्सलरपदी निवड झाली. हिटलरने कामगार संघटनांवर व सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली. सरकार, अर्थव्यवस्था, मीडिया आणि सर्व सांस्कृतिक उपक्रम नाझींच्या नियंत्रणाखाली आणले . जर्मनी एक-पक्षीय हुकुमशाही राज्य झाले.२८ फ ेब्रुवारी १९३३ च्या 'फायर डिक्री'ने वायमर घटनेने दिलेले भाषण स्वातंत्र्य, प्रेस असेंब्ली यासारखे नागरी हक्क निलंबित केले.जर्मनीत लोकशाही संपली होती. डॉल्फ हिटलर लोकशाही जर्मन प्रजासत्ताक नष्ट करण्यात आणि एकाधिकारशाही, वर्णद्वेषी शासन स्थापन करण्यात यशस्वी झाला . पहिल्या जर्मन एकाग्रता शिबिरांची स्थापना हे शासनातील बदलाचे एक निःसंदिग्ध चिन्ह होते. १९३३-१९४५ नाझी राजवटीत संविधान बाजूला ठेवण्यात आले होते . मित्र राष्ट्रांच्या ताब्यादरम्यान , कोणतेही स्वतंत्र जर्मन सरकार किंवा कुलपती अस्तित्वात नव्हते; आणि पूर्व जर्मनीमध्ये कार्यालयाची पुनर्रचना झाली नाही, अशा प्रकारे पूर्व जर्मनीचे सरकार प्रमुख मंत्री परिषदेचे अध्यक्ष होते.१९४९ च्या मूलभूत कायद्याने अध्यक्षाची भूमिका कमी करताना पश्चिम जर्मनीतील कुलपतींना सर्वात महत्त्वाचे कार्यालय बनवले .१९४९ पासून संघराज्य प्रणालीवर ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन आणि सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ जर्मनी या पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. जर्मनीमध्ये संसदीय व्यवस्था बहुपक्षीय व्यवस्था आहे. दोन मोठे पक्ष, तीन छोटे पक्ष आणि अनेक लहान पक्ष सध्या जर्मनीच्या सार्वत्रिक निवडणुकीत असतात.जर्मन संसद जर्मन लोकांद्वारे निवडली जाते आणि त्यांचे प्रतिनिधित्व करतात संसदेत राष्ट्रीय कायदे बनवले जातात.तसे निवडणुकीनंतर अनेक चॅन्सलर जर्मनीचे प्रमुख झाले. असो, मात्र २००५ च्या फेडरल निवडणुकीनंतर जर्मनीला वेगळी ओळख निर्माण करून देणाऱ्या चॅन्सलर जेंला मर्केल. पहिल्या महिला चॅन्सलर ठरल्या.२००५ च्या निवडणुकीत ख्रिश्चन सोशल युनियन आणि सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ जर्मनी यांचा समावेश असलेल्या भव्य युतीचे नेतृत्व करत मर्केल यांची कुलपती म्हणून निवड झाली . चॅन्सलर म्हणून निवडून आलेल्या त्या पहिल्या महिला . आणि पूर्वीच्या पूर्व जर्मनीमध्ये वाढलेल्या पुन:एकीकृत जर्मनीच्या पहिल्या कुलपती ठरल्या.२००९ च्या फ ेडरल निवडणुकीत ,ख्रिश्चन सोशल युनियनने मतांचा सर्वात मोठा वाटा मिळवला आणि त्यानंतर मर्केलने फ्री डेमोक्रॅटिक पार्टी सोबत युती सरकार स्थापन केले, जी महा - आघाडी पेक्षा ख्रिश्चन सोशल युनियनला अधिक अनुकूल होती.२०१३ -२०१७ च्या फेडरल निवडणुकीत , मर्केलने ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियनचे नेतृत्व करून चौथ्यांदा सर्वात मोठा पक्ष बनला अँजेला मर्केल चॅन्सलर म्हणजे कुलपती झाल्या.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

अँजेला मर्केल यांचा जन्म १७ जुलै १९५४ रोजी हॅम्बर्ग, पश्चिम जर्मनीमध्ये झाला.मर्केल लहान असताना तिचे कुटुंब पूर्व जर्मनीला गेले . मर्केल यांनी १९८६ मध्ये क्वांटम केमिस्ट्रीमध्ये डॉक्टरेट मिळवली आणि १९८९ पर्यंत संशोधन शास्त्रज्ञ म्हणून काम केले. त्यानंतर १९८९ च्या क्रांतीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजकारणात प्रवेश केला , ज्यांच्या नेतृत्वाखालील पूर्व जर्मनीच्या पहिल्या लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारच्या उप-प्रवक्त्या म्हणून काम केले. लोथर डी मैझिरे १९९० मध्ये जर्मन पुनर्मिलनानंतर , मर्केल मेक्लेनबर्ग - व्होरपोमेर्न राज्यासाठी बुंडेस्टॅगसाठी निवडून आल्या . कुलपती हेल्मुट कोहल यांचे आश्रयस्थान म्हणून , मर्केल यांची १९९१ मध्ये महिला आणि युवक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली, नंतर १९९४ मध्ये त्या पर्यावरण, निसर्ग संवर्धन आणि परमाणु सुरक्षा मंत्री झाल्या. पर्यावरण मंत्री म्हणून, मर्केल यांनी संयुक्त राष्ट्राच्या १९९५ च्या बर्लिन हवामान बदल परिषदेची स्थापना करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ग्रीन हाऊस वायू उत्सर्जन कमी करण्याच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय वचनबद्धतेचा सर्वात उल्लेखनीय परिणाम आणल्याचे श्रेय मर्केल यांना दिले जाते. चॅन्सलर होण्याअगोदर त्यांनी अनेक महत्त्वाची पदं भुषवली ज्या पदांचा फायदा जर्मनीला आणि एकूणच जगाला झाला.त्यांना १९९८ च्या फेडरल निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. मर्केल यांची पक्षाच्या सरचिटणीस म्हणून निवड झाली. पक्ष त्यानंतर दोन वर्षांनंतर त्या पक्षाच्या पहिल्या महिला नेत्या आणि विरोधी पक्षाच्या पहिल्या महिला नेत्या झाल्या. परराष्ट्र धोरणात , मर्केल यांनी युरोपियन युनियन आणि नाटोच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय सहकार्यावर आणि ट्रान्साटलांटिक आर्थिक संबंध मजबूत करण्यावर भर दिला २००८ मध्ये, मर्केल यांनी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून काम केले आणि लिस्बन करार आणि बर्लिन घोषणेच्या वाटाघाटी मध्ये मध्यवर्ती भूमिका बजावली . मर्केलच्या सरकारांनी जागतिक २००७-२००८ आर्थिक संकट आणि युरोपियन कर्ज संकट व्यवस्थापित केले . तिने २००८ च्या युरोपियन युनियन उत्तेजक योजनेची वाटाघाटी केली, ज्यामध्ये मोठ्या मंदीचा सामना करण्यासाठी पायाभूत सुविधा खर्च आणि सार्वजनिक गुंतवणूक यावर लक्ष केंद्रित केले गेले . देशांतर्गत धोरणामध्ये, मर्केलच्या एनर्जीवेंडे कार्यक्रमाने नूतनीकरणक्षम ऊर्जा स्त्रोतांच्या विकासास समर्थन दिले आणि अखेरीस जर्मनीमध्ये अणुऊर्जेचा वापर बंद केला . बुंडेस्वेहरमधील सुधारणा , आरोग्य सेवा सुधारणा, २०१० चे युरोपियन स्थलांतरित संकट आणि कोविड-१९ साथीचा रोग तिच्या कुलपतीपदाच्या काळात प्रमुख समस्या होत्या. मर्केल यांनी २०१८ मध्ये ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियनच्या नेत्याचे पद सोडले आणि २०२१ च्या फेडरल निवडणुकीत कुलपती म्हणून पाचव्यांदा निवड केली नाही. मेर्केल या जर्मनीच्या चॅन्सलर पदावर १६ वर्षं होत्या. पुढची निवडणूक न लढविण्याचं त्यांनी शेवटच्या कार्यकालात जाहीर केलं होतं. त्यांची १६ वर्षांची कारकीर्द जर्मनीच्या नाही तर जगाच्या लक्षात राहणारी आहे. त्यांची कार्य शैली, स्पष्टवक्तेपणा, मानवतावादी दृष्टिकोन अफाट होता. आपल्याकडील व जगातील इतर सत्ता प्रमुखांना हा आदर्श.

# विधानसभा निवडणूक वातावरण तापले!

## पडघम : केजमध्ये साठे पून्हा उतरणार रिंगणात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकांचा धुराळा कमी होताच आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. अवघ्या तीन ते चार महिन्यांवर विधानसभा निवडणुका येऊन ठेपल्या आहेत. आपापल्या पक्षांकडून सध्या मोठ्या प्रमाणावर उमेदवारांची चाचणी सुरु असून निवडणुकीची रणनीती ठरवण्याचेही काम वेगाने होत आहे. यामध्ये जुन्या चेहऱ्यांसह मोठ्या प्रमाणावर नवे चेहरेही निवडणुकीच्या मैदानात उतरण्यासाठी सज्ज झालेले आहेत. महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी येत्या तीन ते चार महिन्यांमध्ये निवडणुका होत आहेत. मागच्या पाच वर्षांमध्ये अनेक घडामोडी घडल्या आणि यामध्ये कित्येकांचे पक्षांतरही झाले. मात्र असे असले तरी जे काही विकासात्मक दृष्टी घेऊन आपला मतदारसंघ विकसित करण्याचे स्वप्न बाळगत आहेत त्यांना यावेळेस मतदार पसंती देतील असे दिसत आहे. केज विधानसभा मतदारसंघांमध्ये मागच्या कित्येक वर्षांपासून विकासाचा अनुशेष आश्वासने आणि केवळ भूलथापांनी भरला गेलेला आहे. ठोस अशा प्रकारचे कुठलेच शाश्वत काम केज विधानसभा मतदारसंघांमध्ये झालेली नाही. निवडणुकी दरम्यान मोठ मोठी आश्वासने द्यायची, ऐनवेळी पक्षांतर करायचे आणि सत्ता मिळवायची एवढेच काय ते विधानसभेचे राजकारण दिसून येत आहे.येणाऱ्या विधानसभेसभा निवडणुकीमध्ये

माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब यांची एन्ट्री शरद चंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून होनार आहे.या निवडणुकीत अगदीच जनतेच्या मनात असणारे पृथ्वीराज साठे यांना मतदारसंघातील मतदारांचा मोठ्या प्रमाणावर त्यांना पाठिंबा असल्याचे समजले जाते आहे. माजी आमदार पृथ्वीराज साठे हे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्यांचे भरीव योगदान आहे असे पृथ्वीराज साठे विधानसभा निवडणुकीत उतरणार असल्याचे समजले जाते आहे. पृथ्वीराज साठे यांनी मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणावर त्यांनी संपर्क वाढवलेला असल्याने मतदारसंघातील बहुतांश गावामध्ये ते पोहोचलेले आहेत. मतदार संघातील कित्येक स्थानिक लोकप्रतिनिधी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्या पाठीशी असून केजचे भावी आमदार म्हणून त्यांच्याकडे जनता पाहत आहे. पृथ्वीराज साठे यांनीही सत्तेमध्ये नसताना सुद्धा कित्येक विकासात्मक कामे ही पुढे होऊन केलेली आहेत. आरोग्य, शैक्षणिक, पाण्याचे प्रश्न अशा कामांच्या स्वरुपात मतदार संघात चांगल्या प्रकारे ओळख करून घेतली असल्याने गावागावात त्यांचे मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते आहेत. लहानपणा पासूनच सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी असलेले माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी सर्वसामान्यांचे मूलभूत प्रश्न स्वखर्चातून पूर्ण केलेले आहेत. दरम्यान केज विधानसभा मतदारसंघाचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आणि विशेषत केज तालुक्याची जान आणि कळवळा असणारे पृथ्वीराज साठे साहेब यांच्यासारख्या समाजशील उमेदवाराला मतदार पसंती देण्याच्या मानसिकतेत असल्याचे दिसून येत आहे.

# मुलाच्या खून प्रकरणात आईला जामीन मंजूर!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील शेख नाजीया शेख तैवर रा. दाऊदपुरा बीड ही तीचा मुलगा शेख इजान वय- १४ वर्षे, यांच्या सोबत घरामध्ये असताना तीने त्याचा कान, तोंड, मान, कशाच्या तरी सहाय्याने दाबुन त्याचा खुन केला असा आरोप शेख नाजीया वर करण्यात आला होता. याबाबत पोलीसांनी आकस्मात मृत्यूची नोंद ०४/२०२४ नुसार दाखल केली होती. यामध्ये तपासी अधिकारी यांनी शेजारील लोकांचे अनेकांचे जवाब घेतले त्यामध्ये शेख नाजीया व तीचा मुलगा शेख इजान हे दोघे घरामध्ये असल्याचे सर्वजण सांगत होते व नाजीया हीचे प्रेमसंबंध इतराशी जोडलेले होते व तसा जवाब दिला होता. त्याअनुषंगाने पोलीसांशी डरीं ड्शशप या थेरीनुसार आरोपी ही मयतासोबत शेवटच्या क्षणी असल्यामुळे पेठ बीड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४४/२०२४ कलम ३०२ भा.दं.वि. नुसार दाखल झाला, त्यामध्ये तपास झड्ख उबाळे कडे देण्यात आला होता. त्यानंतर सदरील गुन्ह्याचे गांभीर्य पाहुन गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांचेकडे देण्यात आला. या प्रकरणात पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांनी आजु बाजुच्या लोकांचे संशयीताचे जवाब घेतले व आरोपीस दिनांक ०७/०३/२०२४ रोजी अटक केले तेंव्हा पासुन आरोपी ही जिल्हा कारागृह बीड येथे कैद आहे. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी सेशन केस क्र. ८८/२४ नुसार दोषारोपपत्र दाखल केले.

# करामती पूजा खेडकरांवर गुन्हा दाखल

## चर्चेतले : मनमानी रुबाब महागात पडला

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे नियम डावलून आणि ओळख लपवून अधिक वेळा यूपीएससीची परीक्षा दिल्याचा ठपका खेडकर यांच्यावर ठेवण्यात आला आहे. यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तसेच यूपीएसएसी परीक्षेत २०२२ साली झालेली निवड का रद्द करू नये? असाही सवाल आयोगाने उपस्थित केला आहे. याबद्दल सविस्तर पत्रकच काढण्यात आले आहे. यानंतर आता पूजा खेडकर यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. पुण्यातील जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी पूजा खेडकर यांची तक्रार केल्यानंतर त्यांची वाशिम येथे बदली करण्यात आली होती. मागच्या दोन दिवसांपासून त्या वाशिम गेस्ट हाऊसमध्येच होत्या. आज दुपारी त्या गेस्ट हाऊसमधून बाहेर पडल्या. यावेळी माध्यमांनी त्यांना गराडा घालत त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावळी त्या म्हणाल्या, न्यायव्यवस्था त्यांचे काम करेल. त्यांचा जो काही निर्णय असेल तो मी स्वीकारेल.



### यूपीएससीकडून सखोल चौकशी

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रकरणानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने पूजा खेडकर यांच्या प्रकरणाचा सखोल तपास केला. नागरी सेवा परीक्षा - २०२२ मधून पूजा खेडकर यांची निवड झाली होती. या तपासातून समोर आले की, पूजा खेडकर यांनी नावे बदलून अनेकवेळा यूपीएससीची परीक्षा दिली. प्रत्येक प्रवर्गासाठी परीक्षा कितीवेळा द्यावी, याची नियमावली आखून दिलेली आहे. पूजा खेडकर यांनी स्वतःचे, कधी वडील आणि आईचे नाव बदलून, तसेच स्वतःचा फोटो, स्वाक्षरी, ईमेल आयडी आणि फोन नंबर बदलून अनेकवेळा यूपीएससीची परीक्षा दिली, असे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पत्रकात म्हटले आहे

## पान सहा वरून

**सरकारला आरटीई प्रवेश...**

अंतिम निकाल सुनावताना न्या. देवेंद्रकुमार उपाध्ये यांच्या खंडपीठाने म्हटलं की, राज्य सरकारने अचानकपणे आरटीई प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेणे हे घटनाबाह्य आहे. कायद्यात रातोरात बदल करता येणार नाही त्यामुळे हा अध्यादेश आम्ही रद्द करतोय असं म्हटलं. दरम्यान, आरटीई अंतर्गत शाळांच्या परिसरातील वंचित आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे खासगी शाळांनाही आणि राज्य सरकारलाही बंधनकारक राहील असे न्यायलयाने म्हंटले आहे.

**चोरटा दोन पिकअपसह...**

गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतास मा. न्यायालयाने दिनांक २०/०७/२०२४ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. सदरची कार्यवाही ही मा. श्री. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक, बीड, मा. श्रीमती. चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस अधीक्षक कमलेश मीना व पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन पोलीस स्टेशन केज यांचे आदेशान्वये पोउपनि राजेश पाटील, पोना दिलीप गित्ते, पोह,उमेश आघाव, पोह,बाळासाहेब अहंकारे, पोअं,रशिद शेख, पोअं,संतोष गित्ते यांचे पथकाने केली आहे.

**अज्ञात वाहनाने दोघांना...**

उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता त्यास वैद्यकीय सूत्रांनी मृत घोषित केले दुसरा एक राहुल लिंबाजी राठोड( वय २६) यास बेशुद्ध अवस्थेत नगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे त्याच्या मेंदूला मार लागला आहे दरम्यान अपघातात मृत झालेल्या डॉ गणेश पवार यांच्या पश्चात आई वडील पत्नी एक भाऊ असा परिवार आहे शुक्रवारी रात्री उशिरा त्याचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेची माहिती जरंडी गावात वाऱ्या सारखी पसरताच गावात शोककळा पसरली होती सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली होती.

खासदार निलेश लंकेची मदतीचा हात

नगर चे खासदार निलेश लंके यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी जखमींना रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदत करून नातेवाईक यांना घटनास्थळी धीर दिला.

**सुटीच्या दिवशी धान्याचा...**कळवूनही नेमके सुटीच्या दिवशी कॅन्टर, टेम्पोद्वारे धान्य-माल पुरवठा सुटीच्या दिवशी किंवा दुपारी अंगणवाडी केंद्र सुटल्यानंतर करतात. हा विषय अनेकवेळा अंगणवाडी कार्यकर्त्या,मदतनीस यांनी वरिष्ठ कार्यालयास तोंडी कळविला आहे, परंतु संबंधित पुरवठादारास फरक पडला नाही.दरम्यान कालच गाडी भरली असल्याने मी आज सुटीच्या दिवशी माल पुरवठा केला आहे. समाधान गोलर, टेम्पो चालक.

**बीडमध्ये होतेय रुग्णांचे...**

तिथे काम करणारे टेक्नीशियन यांचे शिक्षण पुर्ण आहे का? ह्या गोष्टी व तो लॅब चालक कट प्रॅक्टीस करुन नागरिकांची लुट तर करत नाही ना ? याची चौकशी करावी व सर्व नियमांचे पालन होत आहे का याचा आढावा घेण्यात यावा ही नम्र विनंती तसेच नियमबाह्य लॅबचालकावर कार्यवाही करुन त्यांची लॅब बंद करण्यात यावी अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**आई-वडील अन् शिक्षक...**

जात.... मी म्हणालो काय सांगू दोन पाय- दोन हातही कविता सादर करत मुलांनी या बालवायत आई-वडील आणि शिक्षक यांच्याकडून मिळालेले संस्कार हेच व्यक्तीला पुढील आयुष्याची ओळख देत असतात असे सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव एड अजय बुरांडे ह्यांनी करत संस्था ही केवळ विद्यार्थ्यांसाठी काम करत असल्याचे सांगितले.या प्रसंगी नुकत्याच संपन्न झालेल्या १० वि, १२ वि बोर्ड परीक्षेतील तसेच राज्य स्तरावर आपल्या क्रीडा कौशल्याने छाप निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.या व्याख्यानमालेचे प्रास्तावित मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, सूत्र संचलन अंगद पेड्डेवाड तर आभार व्यक्त केशव दिक्षित यांनी केले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# महामार्गासाठी वटवृक्षाची कत्तल!

**दुर्लक्ष** नव्या रोपाची लागवड करण्याकडे कानाडोळा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई केज बीड या महामार्गाचे काम करण्यासाठी महाकाय वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. झाडांची कत्तल झाल्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा ओसाड दिसत आहेत. पावसाळा सुरू झालेला आहे. यामध्ये नव्या रोपाची लागवड करण्याकडे वनविभागाचा कानाडोळा केला जात आहे. तरी यावर्षी तरी नव्या रोपांची लागवड करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. रस्त्याच्या कामासाठी वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. कत्तल झालेल्या वटवृक्षांनी आपले डोळे मिटले आहेत. त्यांना पुनर्जीवित करता आले असते रस्त्याच्या बाजूला पुनरोपण करता आले असते मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा रोपांची लागवड करण्यात येणार असा फतवाही निघाला.



### दुतर्फा वृक्षांची लागवड करावी

प्रत्यक्षदर्शी अद्यापपर्यंत कोणतेही रोप लावले गेले नाही. यामुळेच विकासाकडे जाणारे महामार्ग हे विनाशाकडे जातात की काय असा प्रश्न निसर्ग प्रेमींमध्ये निर्माण झाला आहे. वृक्षाचे पुनर्जीवन करावे व रस्त्याच्या दुतर्फा हा रस्त्याची लागवड करावी अशी मागणी केली जात आहे. मागील वर्षों काही रोपे लावण्याचा दिखावा करण्यात आला मात्र प्रत्यक्षात एकही रोप जगलेले नाही.

### वृक्षतोड खुलेआम चालू

हैवनीकरण सध्या सर्वत्र वृक्षतोड खुलेआम चालू आहे वनीकरण विभाग पाहतो आहे. वृक्षलागवड केवळ कागदावरच होते शतकोटी वृक्ष लागवडीचा बोजवारा उडालेला सर्वश्रुत आहे. या प्रकरणी वृक्ष मित्रांनी यासाठी मंत्रालयात मागणी केली मात्र याकडे कोणी लक्ष घातले नाही. परिणामत सर्व वृक्षांची कत्तल झाली आहे. सध्या रस्त्याच्या दुतर्फा या वृक्षांचे अवशेष पडलेले आहेत. याकडे बघून नवी पालवी कधी फुटणार कधी उगवणार आणि पर्यावरणाचे संवर्धन कधी होणार असा प्रश्न उभा आहे याची दखल घेऊन वृक्षलागवड तत्काळ व्हावी अशी मागणी केली जात आहे.

# तृप्ती कोठारी ठरल्या 'आयकॉन'

**अभीनंदनीय :** उत्कृष्ट कार्याबद्दल आयकॉन आवार्डने गौरव



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जालना शहरातील नामांकित कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कुलच्या संचालिका तथा दैनिक लोकाशाचे संपादक विजयराज बंब यांच्या कन्या तृप्ती प्रसन्ना कोठारी-बंब यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेने त्यांना इंटरनॅशनल आयकॉन आवार्ड २०२४ ने सन्मानित केले आहे.

भारताचे माजी केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन राज्यमंत्री श्री. जोसेफ, न्यायाधीश अमरेश्वर प्रताप साही, क्रिकेटर चेतन शर्मा यांच्यासह इतर प्रमुख मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, हा आवार्ड मिळाल्याबद्दल दि.१९ जुलै रोजी जिल्हाधिकारी श्रीकृष्णा पांचाल यांच्या हस्ते तृप्ती कोठारी यांचा गौरव करण्यात आला. कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कुलने जालनाकरांना शैक्षणिक क्षेत्रातील एक उत्कृष्ट सक्षम पर्याय दिला असल्याचे उद्गार यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्णा पांचाल यांनी काढले.यावेळी उपजिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, कोठारी ड्रीम स्कूलचे अध्यक्ष विनयकुमार कोठारी, संपादक विजयराज बंब, भारतीय जैन संघटना जिल्हा अध्यक्ष दिनेश राका, विवेकानंद हॉस्पिटलचे डॉक्टर सचदेव, एमबी ग्रुपचे अल्केश कुमार, रोटरी डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल डॉक्टर सुरेश साबू, कोठारी ड्रीम स्कूलचे सेक्रेटरी प्रसन्ना कोठारी, अपूर्वा जैन आदी मान्यवर उपस्थित होते.

# किटकांच्या प्रादुर्भावाने शेतकरी त्रस्त

**डॉ.गणेश ढवळे :** लिंबागणेश येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश परीसरात आठवडाभरापासून पाऊस पडत असुन ढगाळ वातावरणामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापुस, तुर,उडीद,मुग आदि पिकांवर बुरशी व किटकांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी त्रस्त झाले असुन या पिक रोगांवरील किड व रोग पाहणी आणि संरक्षण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि मार्गदर्शन कृषी विभागाकडून करण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे व शेतकऱ्यांनी केली होती.

या अनुषंगाने आज दि.१९ शुक्रवार रोजी सकाळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागातील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.श्रीकृष्ण झगडे,तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे,मंडळ कृषी अधिकारी प्रशांत घुमरे, कृषी पर्यवेक्षक संतोष काशिद आणि कृषी सहाय्यक रामेश्वर पेसगुडे यांनी शेतीच्या बांधावर जाऊन पिकांवरील किड व रोग पाहणी करत मार्गदर्शन केले.यावेळी अर्जुन गिरे, अमोल गिरे,अझीम सय्यद,बबन गिरे, सर्जेराव मुळे, वैभव गिरे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदी उपस्थित होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथील पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ.श्रीकृष्ण झगडे यांनी सोयाबीन पिक संदर्भात मार्गदर्शन करताना ज्या ठिकाणी पाणी जमिनीत साचुन राहते त्याठिकाणी झाडांची मुळे जमिनीतुन अन्नद्रव्य घेण्याची प्रक्रिया बंद पडते.अशा जमिनीमध्ये सोयाबीनची पाने पिवळी पडत आहेत अशा ठिकाणी फेरस सल्फेट (विद्राव्य) ५० ग्राम + १९:१९:१९ (विद्राव्य) १०० ग्रम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. उंट अळी,केसाळ अळी, लष्करी अळी या प्रकारच्या अळी वर्गीय किडींच्या व्यवस्थापनासाठी कामगंध सापळ्यांचा सर्वेक्षणासाठी वापर करावा.तसेच ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.अळी वर्गीय कीडींचा प्रादुर्भाव जास्त असल्यास प्रोफानोफोस ५० ईसी ४०० मिली किंवा क्लो-यानट्रानीलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली किंवा इंडोक्साकार्ब १५.८ टक्के ईसी १४० मिली यापैकी एका किटकनाशकाची प्रती २०० लिटर पाण्यातून फवारणी करावी.खोडमाशी तसेच चक्री भुंगा या किडींच्या व्यावस्थापनासाठी इथिओन ५० टक्के इसी ६०० मिली किंवा क्लो-यानट्रानीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रती २०० लिटर पाण्यातून एक एकर क्षेत्रासाठी या प्रमाणात फवारणी घ्यावी.

फवारणी करताना एकच किटकनाशक लागोपाठ फवारणीसाठी वापरू नये. किटकशाशकांची आलटुन पालटुन फवारणी घ्यावी.

# गायनाने भक्तीचा अवघा रंग एक झाला!

**सांस्कृतिक :** रसिक फाउंडेशनच्या अयोजनास प्रतिसाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनी

रागेश्री रागातील 'जय जय रामकृष्ण हरी' चा गजर ते 'अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग ' या भैरविने गायक पं. शंकर गिरी आणि आपल्या तबल्यावर वारीत चालण्याची अनुभूती देणारी पं. पांडुरंग पवार यांची तबला साथ बीडकर रसिक श्रोत्यांना भक्तिरसात चिंब करून गेली .रसिक फाउंडेशनने आषाढी एकादशी निमित्ताने आयोजित कार्यक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला.



प्रतिवर्षाप्रमाणे रसिक फाउंडेशन आयोजित अभंग गायनाच्या कार्यक्रमात यावर्षी पं.शंकर गिरी (गायन), पं. पांडुरंग पवार (तबला ), दिनेश डोळे (हार्मोनियम), गणेश डोरले (पखवाज ) नरहरी दळे (टाळ ) यांनी आपल्या गायन वादनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसिक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमर डागा यांनी तर सूत्रसंचालन उपाध्यक्ष महेश वाघमारे यांनी केले. नव्याने मानद संचालक म्हणून नियुक्त केलेल्या सौ.विनया राजीव हसेगावकर आणि सौ.प्रज्ञा हेमंत बडवे यांचे स्वागत आणि सत्कार यावेळी करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ.अनुराग पांगरीकर, सचिव मिलिंद सुंदर,कोषाध्यक्ष विकास कुलकर्णी,सहसचिव प्रदीप मुळे, वाय. जनार्दन राव,सुदर्शन धुतेकर,डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर,राम मोटवाणी,सी.ए.गोपाल मालू,दीपक कर्णावट, डॉ.अनिल बारकुल, विष्णुदास बियाणी,डॉ. प्रसन्न कुलकर्णी,ईश्वर मुथा यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.चिडगोपकरांना साहित्य पुरस्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या मराठी विषयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ.सौ.अलका चिडगोपकर यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेच्यावतीने (मसाप) देण्यात येणारा डॉ.म.वि.गोखले पुरस्कृत 'प्राचार्य शं.वा.तथा सोनोपंत दांडेकर स्मृती पुरस्कार' यंदा डॉ.अलका चिडगोपकर यांच्या 'मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींची काव्यधारा' या ग्रंथाला मिळाला आहे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. टिळक रस्त्यावरील मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ.मुकुंद दातार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्कारा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे उप-प्राचार्य डॉ.शिवाजी मोरे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी यांनी या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले.



**बीड :** स्वा सावरकर शिशु वाटिकेत आषाढीनिमित्त बाल दिंडी काढली होती,यावेळी आदी.

# विशालगड हिंसाचार प्रकरणी कडकडीत बंद

**मागणी :** समाज कंठकावर कारवाई करा

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील गाजापुर विशालगड येथे झालेल्या अतिक्रमण च्या नावाखाली मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळांना (मस्जिद, दर्गा) व धार्मिक पुस्तके (पवित्र कुराण) यांची विटंबना करून मुस्लिम समाजाचे घरांना टार्गेट करुन अशा प्रकारे मुस्लिम समाजावर अन्याय अत्याचार केल्याची घटना घडली, मुस्लिम समाजावर अतिक्रमण च्या नावाने जाणून बुजून हल्ले चढविणे कोणतेही मुद्दे समोर करुन त्रास देण्याचा काम या दंग्याखोराकडून होत आहे अशा दंगेखोरांना प्रशासनाने प्रतिबंध करावा. व त्यांच्यावर युएपिए कायदे अंतर्गत कडक कारवाई करण्यात यावी तसेच हल्ल्यामध्ये धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाच्या घरांची शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या प्रत्येकी ३ लाख रुपये सरकार तर्फे देण्यात यावे या मागणीसाठी सिरसाळ्यात काल रोजी सकल मुस्लिम समाजाच्या वतीने सिरसाळा कडकडीत बंद पुकारण्यात आला असून दुपारी आडीच वाजता टिपू सुलतान चौक पासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंत शांततेत रॅली काढण्यात आली होती, या रॅली मध्ये हजारो संख्येने मुस्लिम बांधव सभागी झाले होते यावेळी मुफ्ती साहेब व मोलाना मोईन, नसिब शेख यांनी मनोगत व्यक्त करत शासनाने मुस्लिम समाजाला संरक्षण देवुन अश्या समाज कंठकावर विशेष कायद्या अंतर्गत कडक कार्यवाही करून आरोपींना तात्काळ अटक करावे अशी मागणी केली . यावेळी पोलिस स्टेशन मार्फत एपीआय गोरखनाथ दहिफळे यांना मुस्लिम समाजाच्या वतीने मागण्याचे निवेदन देण्यात आले असून ह्या पूर्ण मागण्याचे निवेदन शासनापर्यंत पोहचविले जाईल असे ग्वाही दहिफळे यांनी दिली आहे.यावेळी उपस्थित सरपंच अनवर पट्टेदार, मोईन मोलाना, नशीब शेख,जावेद पठाण, रफिक पठाण, इम्रान पठाण, नदीम शेख, रफीक चौधरी, आयास इनामदार यांच्या सह सिरसाळ्यातील मोठ्या संख्येत मुस्लिम समाज उपस्थित होता.

**सवाल** एकाही वाळू माफियावर कारवाई नाही?

# केजमध्ये वाळू माफियांवर वचक कोणाचा!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील पींपरी ,आढाळा, बोरगाव,भोपला ,वरपगाव येथील गावच्या परीसरात नद्या गेल्या आहेत व या सर्व नद्या मांजरा नदीला मिळालेल्या आहेत तरी या छोट्या मोठ्या नदी पात्रातुन अवैध्य वाळू उपसा दीवस ,रात्र वाळुमाफीया बेसुमार सुमारास वाळु सुरू आहे.वाळु तस्करांच्या बातम्या अनेक दैनिकांमधून प्रसारित करून शासन व प्रशासनाला जागे करण्याचे काम सातत्याने प्रयत्न करण्यात आले पन केज तालुक्यातील पींपरी, आढाळा, बोरगाव,भोपला ,वरपगाव येथील नदी पात्रातील अवैध्यरित्या वाळूचा उपसा रात्र,दीवस सुरूच आसतो व वाळुमाफीयांना कुठल्याही प्रकारची भीती नाही कींवा प्रशासन या अवैद्या रित्या होत असलेल्या वाळु उपस्यावर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई करत नाही तसेच वाळु माफीयान विषयी नागरिकांन मध्ये असे चर्चा सत्र सुरू झाले आहे की वाळुमाफीयांन मध्ये असे बोलले जाते की आम्ही कुनाला भीनार नाही आमच्या वर कारवाई होत नाही कारण आम्ही हप्ता दीलेला आहे जर



संमंधीत प्रशासन हप्ता घेऊन वाळु माफीयान वाळु काढण्यासाठी परवानगी देत असेल तर शासनाचा पगार संमंधीत अधिकारी घेतात कशाला व प्रशासन आहे कशाला असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे तरी केज तालुक्यातील पींपरी, आढाळा, बोरगाव, भोपला वाळू नदी पात्रातुन राज रोज पणे रात्रीच्या वेळी चालू असते वाळू तस्करांनी नदी पात्र पोखरुन टाकली आहे. त्यामुळे प्रशासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडवला जात आहे व कारवाई करणारे अधिकारी हप्ता घेऊन गडार आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे. केज तालुक्यातील अवैद्य वाळू तस्करी स्थानिक प्रशासनाच्या डोळ्यासमोर होत असताना सुद्धा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. केज तालुक्यातील अवैध वाळू तस्करी च्या बाबत कोणताही मंडळ अधिकारी तलाठी कारवाई करण्यास घाबरतात असे तालुक्यातील चित्र आहे. विशेष म्हणजे याबाबत माहिती जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक उपविभागीय अधिकारी तहसीलदार ठाणेदार यांना माहीत असून सुद्धा शून्य आहे. रात्रीच्या कारवाई च्या वेळी सुद्धा वाळू तस्करी चालू आहे ही नेमकी कोणाच्या आर्शिवादाने चालू आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

### वाळुचा कीती हप्ता आहे ?

आशीवार्दाने चालू आहे हा मात्र प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे पण कुठल्याही प्रकारची कारवाई दिसून येत नाही रात्रंदिवस आधुनिक यंत्राद्वारे रात्रीच्या अंधारात अवैध वाळू सुरु असते परंतु बातम्या प्रसिद्ध झाल्या की दोन दिवस बंद करतात व नंतर आहे ती परीस्थिती सुरू असते तरी वाळु उपसा हा हप्ता घेऊन चालते म्हणून कारवाई होत नाही का कारवाई करण्याची भीती वाटते प्रशासनाला असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# जात पडताळणी त्रुटीची पूर्तता मोहीम

**धोरण :** विशेष मोहिमेचे करण्यात आले आयोजन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होवू नये. तसेच कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याकरिता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड मार्फत विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रम ाणपत्र समितीस्तरावरुन निर्गमित करण्यासाठी दि.२२.०७.२०२४ ते दि.३१.०७.२०२४ या कालावधीत विशेष मोहिम आयोजित करण्यात आली आहे.सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होवून जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणामध्ये समितीस्तरावर प्राथमिक छाननी करुन ज्या प्रकरणामध्ये कागदपत्रे/पुरावे अभावी त्रुटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस (ड्चड) द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले आहेत. अशी शैक्षणिक, सेवा, निवडणुक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत.

# अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन कोविड पॉझिटिव्ह

देशोन्नती वृत्तसंकलन

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. व्हाईट हाऊसने याबाबत माहिती दिली आहे. व्हाईट हाऊसने म्हटले आहे की, 'त्यांना सौम्य लक्षणे आहेत. आता ते डेलावेअरला परत येईल, जिथे ते विलगीकरणात राहणार आहे.



व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी करीन जीन-पियरे यांनी सांगितले 'लास वेगासमधील त्यांच्या पहिल्या कार्यक्रमानंतर अध्यक्ष बायडेन यांची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली आहेत. त्यांचे लसीकरण करण्यात आले असून त्यांना बूस्टरही देण्यात आले आहे. त्यांना सौम्य लक्षणे आहे.

व्हाईट हाऊस राष्ट्रपतींच्या स्थितीबद्दल नियमित अद्यतने प्रदान करेल कारण ते एकाकी असताना सर्व अधिकृत कर्तव्ये पार पाडत आहेत. लॅटिनो नागरी हक्क संघटनेने सांगितले की जो बायडेन कोरोना पॉझिटिव्ह असल्याने ते नियोजित कार्यक्रमात बोलू शकणार नाहीत. त्याच वेळी, बायडेन कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आल्याने निवडणूक प्रचारावर परिणाम होऊ शकतो.

# अन्वी कामदारला रील काढणे जीवावर बेतले

वृत्तसंस्था...

**मुंबई :** पावसाळ्यात सर्वच लोक फिरायला बाहेर निघतात. अशात पावसाळ्यात अनेक दुर्घटना सुद्धा घडतात. यामध्ये अनेकांना जीवही गमवावा लागतो. अशीच एक घटना माणगाव तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्प असलेल्या धबधबा परीसरात घडली आहे. या दुर्घटनेत व्यवसायाने चार्टर्ड अकाऊंटंट असलेली आणि सोशल मीडियावर सोशल मीडिया इन्फ्लुएंसर म्हणून प्रसिद्ध असलेल्या अन्वी कामदारला आपला जीव गमवाला लागला आहे.



मिळलेल्या माहितीनुसार, चार्टर्ड अकाऊंटंट आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अन्वी कामदार मुंबईच्या माटुंगावरुन ६ मित्रांसोबत माणगाव तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्प असलेल्या धबधबा परीसर फिरायला गेली होती. यावेळी धबधब्याजवळ सेल्फी घेण्याच्या नादात अचानक तिचा तोल गेला आणि ती २०० ते २५० फूट खोल दरीत कोसळली या दुर्घटनेनंतर तिला त्वरित रुग्णालयात नेण्यात आले मात्र तिचा उपचार दरम्यान मृत्यू झाला.

# बऱ्याच लोकांनी माझ्या आजोबांना त्रास दिला

## डोनाल्ड ट्रम्पच्या नातीचे विधान चर्चेत

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. या हल्ल्यात सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या प्रतिहल्ल्यात हल्लेखोराचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, यावरून डोनाल्ड ट्रम्प यांच्या नातीने खेद व्यक्त केला आहे. १७ वर्षीय काई ट्रम्प म्हणाली की, पेनसिल्व्हेनियातील निवडणूक रॅलीदरम्यान आजोबांना गोळ्या घालण्यात आल्याचे लक्षात आले तेव्हा मला धक्का बसला. पण ते सुखरूप आहेत हे मला जाणून घ्यायचे होते. बऱ्याच लोकांनी माझ्या आजोबांना त्रास दिला आहे, परंतु तरीही ते उभे आहेत.



काई म्हणाली की, 'माझे आजोबाही इतर आजोबांप्रमाणे असून ते आम्हाला कँडी आणि सोडा द्यायचे. माझ्या आजोबांना देशाची वेगळी छटा निर्माण करायची आहे. माध्यमांमुळे माझे आजोबांची वेगळी प्रतिमा तयार झाली आहे.

# शंभर घेऊन या आणि सरकार बनवा!

## भाजपला अखिलेश यादव यांची मान्सून ऑफर

वृत्तसंस्था

**लखनौ :** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य हे आमने-सामने आल्याचे दिसत आहे. यानंतर उत्तर प्रदेश भाजपमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला असून, त्यासंदर्भात लखनौपासून दिल्लीपर्यंत बैठका सुरू आहेत. भाजपमधील अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर आता समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी मान्सून ऑफर दिली आहे. अखिलेश यादव यांनी ट्विीट करत १०० आणा, सरकार बनवा!' अशी थेट ऑफरच भाजपला दिली आहे.

याचाच अर्थ १०० आमदारांना सोबत घेऊन या आणि समाजवादी पक्षासोबत उत्तर प्रदेशात सरकार बनवा, असे सूचक आवाहन या माध्यमातून अखिलेख यादव यांनी केले आहे .अखिलेश यादव यांनी ही ऑफर भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांना उद्देशून दिल्याचे बोलले जात आहे.

# मालकाने केला अत्याचार; हत्तीने मालकालाच तुडवले

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** हत्ती हा अतिशय शांत प्राणी आहे पण जेव्हा तो त्याच्या उग्र रूपात येतो तेव्हा तो सर्वात भयानक प्राणी बनतो. असाच एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यामध्ये एका हत्तीला त्याच्या मालकाकडून काठीने मारले जात होते. हत्ती आपल्या मालकाच्या अत्याचाराने इतका अस्वस्थ झाला की त्याने रागाच्या भरात त्याला पायाखाली तुडविले.

हत्ती इतका संतप्त होण्याचे कारणही व्हिडिओमध्ये दिसत आहे. वास्तविक, ती व्यक्ती लोखंडी रॉडने हत्तीला वारंवार टोचत होती. सुरुवातीला हत्तीने शांतपणे उभे राहून मालकाचा छळ सहन केला, पण जेव्हा मालकाने अत्याचार थांबवला नाही तेव्हा त्याचा संयम सुटला आणि त्याला राग अनावर झाला आणि त्याने मालकाला जमिनीवर ढकलले. मग हत्ती मरेपर्यंत त्या व्यक्तीला पायाखाली तुडवत राहिला. अत्याचाराचा संताप आल्याने मृत्यूनानंतरही तो मालकाला कणकेप्रमाणे मळत राहतो. शेवटी हत्ती त्या व्यक्तीला त्याच्या सोंडेने उचलतो आणि हवेत फेकतो. हा प्रकार पाहून एक माणूस त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी धावला पण तोपर्यंत त्या व्यक्तीचा मृत्यू झाला



# शॉपिंग मॉलला लागलेल्या आगीत १६ जणांचा 'मृत्यू'

देशोन्नती वृत्तसंकलन

**झिगोंग :** चीनमध्ये बुधवारी (१७ जुलै) एक मोठी दुर्घटना घडली. चीनच्या झिगोंग शहरातील एका शॉपिंग मॉलमध्ये भीषण आग लागून १६ जणांचा मृत्यू झाला आहे. चीनच्या सरकारी मीडियानुसार, सिचुआन प्रांतातील झिगोंग शहरात एका १४ मजली इमारतीला आग लागली. त्यामुळे अनेक लोक इमारतीत अडकले. या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये इमारतीतून काळा धूर निघताना दिसत आहे.

सरकारी मीडिया सीसीटीव्हीनुसार, आगीची माहिती मिळताच ३०० आपत्कालीन कर्मचारी आणि अग्निशमन दल घटनास्थळी पाठवण्यात आले. आपत्कालीन कर्मचाऱ्यांनी बचाव कार्य केले आणि इमारतीच्या आगीतून सुमारे ३० लोकांना वाचवले. स्थानिक अधिकाऱ्यांच्या हवाल्याने असे सांगण्यात आले आहे की, आगीचे कारण बांधकामाचे काम असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे, त्यामुळे ठिणगी पडली आणि नंतर आग लागली. मात्र, अद्याप अधिकृत वक्तव्य आलेले नाही. चीनच्या आपत्कालीन व्यवस्थापन मंत्रालयाने गुरुवारी एका निवेदनात बचाव कर्मचारी आणि प्रांतीय अधिकाऱ्यांना आगीचे कारण लवकरात लवकर शोधण्यास सांगितले. तसेच या अपघातातून धडा घ्या, जेणेकरून भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत.






# दहा वर्षांत गोव्यातील २६ हजार जणांनी केला भारतीय नागरिकत्वाचा त्याग

# हजारो नागरिकांनी भारतीयत्व सोडले

वृत्तसंस्था

**पणजी :** गोव्यातून हजारो लोक दरवर्षी भारताचे नागरिकत्व सोडून पोर्तुगाल, लंडन, कॅनडासारख्या देशांचे नागरिकत्व घेत आहेत. भारताचे नागरिकत्व सोडून जाणाऱ्या गोमंतकीयांची सर्वाधिक पसंती पोर्तुगालला आहे, हे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. गेल्या दहा वर्षांत सुमारे २६ हजार गोव्यातील नागरिकांनी भारताचे नागरिकत्व सोडले आहे.

चांगली नोकरी, आर्थिक सुबत्ता, चांगले जीवनमान आणि सर्वच दृष्टींनी सुरक्षित जीवन जगण्यासाठी गोव्यातील हजारो लोक भारताचे नागरिकत्व सोडून इतर देशांमध्ये स्थायिक होत आहेत. यात दुहेरी नागरिकत्वाला कंटाळून जाणाऱ्यांचीही संख्या मोठी आहे. दुहेरी नागरिकत्वाचा गुंता सुटलेला नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पोर्तुगाल किंवा अन्य देशांचे नागरिकत्व घेण्यावर अनेक गोमंतकीय भर देत आहेत. माहिती अधिकाराच्या अर्जातून मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय नागरिकत्वाचा त्याग करून भारतीय पासपोर्ट सरेंडर करून जाणारे अनेक गोमंतकीय हे पोर्तुगालला पसंती देतात.

## नागरिकत्वचा प्रश्न विधानसभेत

या विषयी राज्य विधानसभेतही एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात माहिती दिलेली आहे. त्याप्रमाणे १ जानेवारी २०१४ ते ३१ मार्च २०२४ या दहा वर्षांच्या कालावधीत २५,९३९ गोमंतकीयांनी भारतीय नागरिकत्वाचा त्याग करून पोर्तुगीज किंवा इतर देशांतील नागरिकत्व घेतले आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी उत्तरात तसे म्हटले आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी ज्या लोकांनी पासपोर्ट सरेंडर केले आहेत, त्यांची नावे देण्यास नकार दिला आहे. माहिती फार मोठी आहे, तसेच ती माहिती विधानसभेच्या कामकाज नियमाप्रमाणे देता येत नाही, असेही उत्तरात म्हटले आहे. पासपोर्ट सरेंडर करणे ही प्रत्येकाची वैयक्तिक पसंती असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात कुंकळ्ळीचे आमदार युरी आलेमाव यांनी यांनी विधानसभेत एक लेखी प्रश्न विचारला होता.

# केंद्र सरकारने नीती आयोगाची केली पुनर्रचना

## मित्रपक्षांच्या मंत्र्यांसह १५ मान्यवरांचा समावेश

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने नीती आयोगाची पुनर्रचना केली आहे. आता या आयोगात चार पूर्णवेळ सदस्य आणि १५ केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. आयोगात समाविष्ट करण्यात आलेल्या केंद्रीय मंत्र्यांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या मित्रपक्षांच्या काही मंत्र्यांनाही सामावून घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली. आयोगाच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे.

अर्थतज्ञ सुमन के. बेरी यांनाच पुन्हा उपाध्यक्षपदी नेमण्यात आले असून शास्त्रज्ञ व्ही. के. सारस्वत, कृषी अर्थतज्ञ रमेश चंद, बालरोगतज्ञ व्ही. के. पॉल




आणि स्थूल अर्थधोरण तज्ञ अरविंद वीरमणी यांची पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मागच्या नीती आयोगातही हेच चार पूर्णवेळ सदस्य होते. पंधरा केंद्रीय मंत्र्यांपैकी चार पदसिद्ध सदस्य असतील तर ऊर्वरित ११ केंद्रीय मंत्री विशेष अतिथी म्हणून नियुक्त करण्यात आले अशी माहिती देण्यात आली.

# पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकर यांना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**रायगड :** वादग्रस्त प्रशिणार्थी आयएएस डॉ. पूजा खेडकर यांच्यासह त्यांच्या कुटंबातील व्यक्तींबाबत नवनवे खुलासे होत आहेत. काही दिवसांपूर्वी पूजा खेडकर यांच्या आई डॉ. मनोरमा खेडकर यांनी मुळशी तालुक्यातील पौड येथे एका शेतकऱ्याला पिस्तुल दाखवून धमकवल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुणे पोलिसांशी देखील हुज्जत घालत असल्याचा देखील त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. यानंतर पोलिस त्यांचा तपास करत होते, अखेर मनोरमा खेडकर यांना रायगडमधून ताब्यात घेतले आहे.

### पोलिसांची मोठी कारवाई



पूजा खेडकरच्या बाणेर येथील बंगल्यावर जाऊन पोलिसांनी मनोरमा खेडकर असल्याची पाहणी केली होती. त्यावेळी घराच्या गेटवरती कुलूप लावल्याचे निर्दशनास आले. त्यांचा फोन देखील बंद असल्याचे समोर आले होते. त्यानंतर पोलिसांची ३ पथकं मनोरमा खेडकरसह इतरांचा शोध घेत होते. आज अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकरला अटक करण्यात आली. मनोरमा खेडकर महाड तालुक्यातील हिरकणवाडीमधील पार्वती हॉटेलमध्ये लपून बसल्या होत्या. त्यानंतर आज पहाटेच्या सुमारास पोलिसांचं पथक हॉटेलवरती दाखल झाले त्यानंतर मनोरमा खेडकरला अटक करण्यात आली. पुणे ग्रामीण पोलिसांचे पथक मनोरमा खेडकर यांना घेऊन पुण्याच्या दिशेने रवाना झाले आहे.

पिस्तूलाचा धाक दाखवून मुळशीतील शेतकऱ्यांना दमदाटी केल्याची चित्रफीत व्हायरल झाल्यानंतर आयएएस पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## हरियाणात आम आदमी पक्षाची एकटा चलोची भुमिका

**हरियाणा :** हरियाणामध्ये ऑक्टोबरमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत आम आदमी पार्टी राज्यातील सर्व ९० विधानसभा जागांवर एकट्याने निवडणूक लढवणार आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी चंदीगड येथे पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. हरियाणातील सार्वत्रिक निवडणुका भारत आघाडीने एकत्र लढल्या होत्या. काँग्रेसने राज्यातील १० पैकी नऊ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते, तर आम आदमी पक्षाने कुरुक्षेत्र या एका जागेवरून सुशील गुप्ता यांना उमेदवारी दिली होती. राज्यात काँग्रेसने पाच जागा जिंकल्या होत्या.

# बांगलादेशात हजारो विद्यार्थी उतरले रस्त्यावर

## निदर्शनात ६ जणांचा झाला मृत्यू

वृत्तसंस्था...

**ढाका :** बांगलादेशात आरक्षणावरून गदारोळ झाला होता. यामध्ये आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. बांगलादेशातील हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरून आरक्षण रद्द करण्याची मागणी करत आहे. या निदर्शनाने आता हिंसक रूप धारण केले आहे. पोलिसांशी झालेल्या चकमकीत ६ जणांना जीव गमवावा लागला. त्याचवेळी ४०० हून अधिक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

ढाका ट्रिब्यूनने दिलेल्या वृत्तानुसार, बुधवारी संध्याकाळी ढाकामध्ये आंदोलनाला सुरुवात झाली. दरम्यान, विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये जोरदार चकमक झाली. यामध्ये एका मुलासह ६ जणांना गोळ्या लागल्या. सुरक्षा दलांच्या कारवाईला उत्तर देण्यासाठी विद्यार्थ्यांनी आज गुरुवारी देशव्यापी संप पुकारला आहे. रुग्णालये आणि आपत्कालीन सेवा वगळता सर्व काही बंद राहणार असल्याचे विद्यार्थी नेत्यांनी सांगितले आहे.



**पणजी :** गोवा माईल्सच्या १,५०० टॅक्सींनी गेल्या सहा वर्षांत सरकारला ८.०५ कोटींचा महसूल दिला. पण, स्थानिकांच्या १८ हजार टॅक्सींमुळे सरकारचा ५०० कोटींचा महसूल बुडाला असे म्हणत, वाहतूकमंत्री माविन गुदिन्हो यांनी गुरुवारी विधानसभा सभागृहात गोवा माईल्सचा किल्ला एकहाती लढवला.

# शेअर ट्रेडिंगच्या नावे गंडा घालणाऱ्या तिघांना अटक

## गुन्ह्यांसाठी वापरले ३ हजार सिमकार्ड

वृत्तसंस्था

**ठाणे :** विविध मोबाईल कंपनीच्या सिमविक्री करणाऱ्या एजंटाच्या माध्यमातून दुसऱ्याच्या नावाचे सिमकार्ड घेऊन परराज्यात, विदेशात वापर करून बनावट शेअर ट्रेडिंग एप्लिकेशन साईट्सवरून आर्थिक गंडा घालणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीतील तिघांच्या मुसक्या आवळण्यात गुन्हे शाखा सायबर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाला मोठे यश लाभले आहे.

या कारवाईत सिमकार्डचा वापर करीत परराज्यातून आणि विदेशातून हा गोरखधंदा चालवीत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती सायबर, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त पराग मणेरे यांनी दिली.

चितळसर पोलीस ठाण्याच्या गुन्हे रजिस्टरमध्ये दाखल गुन्ह्यात अज्ञात आरोपींनी मोबाईलवर तक्रारदार यांना एक लिंक पाठवून शेअर गुंतवणुकीत चांगला परतावा मिळण्याचे आमिष दाखवून विश्वास संपादन करीत २९ लाख ३० हजाराचा गंडा घालण्यात आला होता.

# काशी विश्वनाथ मंदिरात व्हीआयपी व स्पर्श दर्शनावर बंदी

## यंदा सावनमध्ये सुविधा नसेल

वृत्तसंस्था

**वाराणसी :** सावन महिन्यात भगवान विश्वनाथाच्या दर्शनात गोंधळ होऊ नये यासाठी मंदिर आणि वाराणसी प्रशासन सज्ज झाले आहे. मंदिर प्रशासनाने सावन काळात भगवान विश्वनाथांच्या व्हीआयपी आणि स्पर्श दर्शनावर पूर्णपणे बंदी घातली आहे. काशी विश्वनाथ मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वभूषण मिश्रा म्हणाले, प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यात, अंदाजानुसार, एक ते दीड कोटी भाविक येतात. यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. ओळींची संख्या वाढवली आहे. तसेच पाणी, कुलर आणि ओआरएस सोल्युशन देण्याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

## महाविद्यालयांतील कॅन्टीनमध्ये समोसे, कचोरीवर बंदी

**नवी दिल्ली :** देशातील महाविद्यालयांच्या कॅन्टीनमध्ये समोसा, कचोरी, नूडल्स, ब्रेड पकोडा यांसारखे खाद्यपदार्थ इथून पुढे उपलब्ध होणार नाहीत. विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतीच विद्यापीठे आणि पदवी महाविद्यालयांच्या कॅन्टीनमध्ये उपलब्ध खाद्यपदार्थांबाबत नोटीस जारी केली आहे.

# मुसळधार पावसामुळे ७० कुटुंबांचा संपर्क तुटला

वृत्तसंस्था...

**पिथौरागढ :** उत्तराखंडमध्ये मान्सूनने पुन्हा जोर धरला आहे. संपूर्ण राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पाऊस पडत असून, हवामान खात्यानेही अलर्ट जारी केला आहे. डोंगरात सततच्या मुसळधार पावसामुळे सर्व नद्या आणि नैसर्गिक जलस्रोत दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पिथौरागढ,

हवामान खात्याने गुरुवारी कुमाऊँच्या पिथौरागढ आणि बागेश्वरमध्येही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पिथौरागढमध्ये रात्री उशिरापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मंदाकिनी नदीच्या पाण्याची पातळी वाढू लागली आहे. पिथौरागढच्या धारचुला मुनसियारीमध्येही मुसळधार पावसाने कहर केला आहे.

### मंदाकिनी नदी उग्र रूपात

मुसळधार पावसामुळे मंदाकिनी नदीतूनही भुकटावं होत आहे. मंदकोट परिसरात मंदाकिनी नदी तिच्या उग्र रूपात दिसत आहे. पाण्याच्या प्रवाहामुळे बंधारे आणि सुरक्षा भिंतींचीही दुरवस्था झाली आहे, अशी परिस्थिती आहे. मंदाकिनी नदीची दिशा भाऊराबागड आणि देवी बागड वस्तीकडे जाते. याशिवाय ग्रामसभा बुंग-बुंग सिमखोला जोडणारा पूलही मुसळधार पावसामुळे नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला.

त्यामुळे येथे राहणाऱ्या ७० कुटुंबांचा संपर्कही तुटला आहे. तात्पुरत्या पुलाची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

### पिथौरागढ, बागेश्वरमध्ये इशारा



बागेश्वरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**सुविचार**- अज्ञान हा अधोगतीचा पाया आहे.

# तत्कालिक घटनांचे लाभार्थी....!

सध्या अनेक देशांमध्ये लोकशाही किंवा तत्सम शासन प्रणाली आहे, त्यात अर्थातच निवडणूक ही एक महत्वाची प्रक्रिया असते. साधारण अशा निवडणुकांमध्ये विद्यमान सरकारची कामगिरी आणि या सरकारला आव्हान देणाऱ्या विरोधी पक्षांचे सरकारच्या कामगिरीवरचे आक्षेप यावर मतदारांची भूमिका ठरणे अपेक्षित असते. सत्ताधारी पक्षाची वैचारिक भूमिका आणि त्या पक्षाने सरकार म्हणून घेतलेले निर्णय, सरकारचे विविध क्षेत्रासंदर्भात धोरण यावर मतदानाच्या माध्यमातून देशातील नागरिकांनी आपली पसंती अथवा नापसंती नोंदवायची असते. अर्थात ही एक आदर्श अपेक्षा म्हणायला हवी. प्रत्यक्षात तसे काही होत नाही. भारत किंवा अन्य कोणताही देश असो, निवडणुकीच्या काळात सर्वसामान्यांच्या जगण्याशी निगडित असलेले मुद्दे अलगद बाजूला सारले जातात आणि राजकारण्यांनी निर्माण केलेल्या किंवा अपघाताने निर्माण झालेल्या तत्कालीक मुद्द्यांवरच निवडणुकीचा निकाल निर्धारित होत असतो. १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली, परिणामी संपूर्ण देशभर काँग्रेसच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण झाली, त्यातच त्यावेळी काँग्रेसचे नेतृत्व इंदिरा गांधी यांचे सुपुत्र राजीव गांधी यांच्याकडे आले, त्यामुळे त्या लोकसभा निवडणुकीत इतर कोणत्याही मुद्द्यांची चर्चा झाली नाही. लोकांनी इंदिरा गांधींना श्रद्धांजली म्हणून काँग्रेसच्या पारड्यात आपल्या मतांचे दान टाकले. त्यानंतर १९९१ मध्ये राजीव गांधींची हत्या झाली आणि काँग्रेसला पुन्हा एकदा लोकांच्या सहानुभूतीचा फायदा मिळाला. मागच्या म्हणजे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदी सरकारची अवस्था बिकट होती. त्या सरकारच्या कामगिरीवर लोकांचा खूप रोष होता. भाजपला सत्ता गमवावी लागेल अशीच परिस्थिती होती, परंतु पुलवामा-बालाकोट घटना घडली आणि आधीपेक्षाही अधिक बहुमत प्राप्त करीत मोदी पुन्हा सत्तेत परतले. सांगायचे तात्पर्य निवडणुकांमध्ये बरेचदा तत्कालीक मुद्दे अतिशय प्रभावी ठरतात. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्येही हे होऊ शकते. सध्या अमेरिकेत निवडणुकीचा माहोल आहे. प्रत्यक्ष मतदान नोव्हेंबर मध्ये होणार असले तरी अध्यक्षपदाचे उमेदवार निश्चित करणे, हा एक मोठा टप्पा सध्या तिथे पार पडत आहे. दोनच दिवसांपूर्वी रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन पार पडले आणि त्यात डोनाल्ड ट्रम्प यांना प्रचंड बहुमताने अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून निवडले गेले. डेमोक्रॅटिक पक्षाकडून विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन सध्यातरी अध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांची अध्यक्षपदाची पहिली कारकीर्द अतिशय वादग्रस्त ठरली होती. खरे तर अमेरिकी मतदारांनी विवेकाने मतदान केले असते तर त्या निवडणुकीत अमेरिकेची पहिली महिला राष्ट्राध्यक्ष म्हणून हिलरी क्लिंटन निवडून आल्या असत्या, परंतु ट्रम्प यांचा अतिउजवा राष्ट्रवाद अमेरिकन मतदारांच्या विवेकावर मात करून गेला. त्यानंतर मागच्या निवडणुकीतही ट्रम्प रिंगणात होते, परंतु यावेळी अमेरिकन मतदारांनी आपली चूक सुधारली आणि डेमोक्रॅट ज्यो बायडेन यांची अध्यक्षपदी निवड केली. निवडणुकीचा हा निकाल खिलाडूवृत्तीने स्वीकारणे ट्रम्प यांना जमले नाही, त्यांनी आपल्या समर्थकांना अमेरिकन संसदेवर हल्ला करण्यासाठी अप्रत्यक्षपणे चिथावणीच दिली. त्यावेळी मोठा हिंसाचार झाला होता, पुढारलेल्या विचारांचा, प्रगत आणि समृद्ध लोकशाहीचा दावा करणाऱ्या अमेरिकेची मान त्या हिंसाचाराने खाली गेली होती. त्या प्रकरणात ट्रम्प यांच्यावर खटला देखील दाखल करण्यात आला होता, अन्य एका खटल्यातही ते दोषी सिद्ध झाले आहेत. त्यामुळे अमेरिकन जनता पुन्हा एकदा या अशा व्यक्तीच्या हाती अमेरिकेची आणि पर्यायाने जगाची धुरा सोपवेल असे वाटत नव्हते, परंतु काहीही करून पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्ष व्हायचेच असा चंग बांधलेल्या ट्रम्प यांनी आपल्या पक्षातील इतर लायक दावेदारांना मागे सारीत आपल्या उमेदवारीचे घोडे दामटले, त्यात त्या परवाच्या हल्ल्याने त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली आणि त्यांनी अधिकृतपणे आपल्या पक्षाच्या उमदेवारीवर शिक्कामोर्तब करून घेतले. ही सहानुभूती केवळ अध्यक्षपदाच्या उमदेवारी पुरती मर्यादित राहणार नाही, असेच चित्र निर्माण झाले आहे. ती तशी मर्यादित राहू नये, यासाठी ट्रम्प आणि त्यांचे निवडणूक व्यवस्थापक काळजी घेतीलच. ज्यो बायडेन यांनी निवडणुकीतून माघार घेतली तर ही निवडणूक चुरशीची होईल, आतापर्यंत तरी असेच चित्र समोर दिसत होते, परंतु आता बायडेन यांनी माघार घेतली तरी ट्रम्प यांचे पारडे जड राहण्याचीच शक्यता अधिक आहे. एक हमखास हारणारी लढाई एका तत्कालिक घटनेमुळे हमखास विजयात परावर्तीत होऊ पाहत आहे. अशा तत्कालिक घटनांच्या लाभार्थ्यांमध्ये आता ट्रम्प यांचाही समावेश होण्याची शक्यता आहे.


# गाव मात्र पाठीशी....!

प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांचे एका पाठोपाठ एक कारनामे उघडकीस येत असतानाच पूजा यांच्या आई-वडिलांचीही काही प्रकरणात चौकशी सुरू झाल्याने हे संपूर्ण खेडकर कुटुंबच गोलमाल असल्याचे स्पष्ट होऊ लागले. पूजा यांनी बनावट प्रमाणपत्रांचा वापर करून प्रवेश घेतला, उत्पन्नाच्या संदर्भातही त्यांनी खोटी माहिती दिली, शारीरिक पात्रतेच्या बाबतीतही त्यांची प्रमाणपत्रे विवादात सापडली आणि आता त्यांच्या मातोश्रींनी हाती पिस्तूल घेत गावातील शेतकऱ्यांना धमकाविल्याचा व्हीडिओ समोर आला, शिवाय त्यांच्या पिताश्रींची प्रचंड संपत्तीदेखील संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या सगळ्या प्रकरणात आपल्याला अटक होऊ शकते, हे लक्षात आल्यावर हे खेडकर दांपत्य भूमिगत झाले आणि पुढे एका हॉटेलमध्ये त्यांनी नाव बदलून आश्रय घेतला. पोलिसांनी त्यांचा पत्ता हुडकून मनोरमाबाईंना अटक केली आहे. पूजा खेडकर यांना मसूरीला तातडीने रिपोर्टींग करण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पुन्हा पडताळणी होण्याची शक्यता आहे आणि त्यात त्यांचा बनावटपणा उघड झाला तर जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाऐवजी एखाद्या कोठडीत त्यांना आपली पुढील स्वप्ने रंगवावी लागू शकतात. या खेडकर कुटुंबाचे असे अनेक कारनामे एकीकडे उघड होत असताना त्यांच्या मूळ गावचे गावकरी मात्र या कुटुंबाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे पाहायला मिळत आहे. खेडकर यांचे मूळ गाव असलेल्या भालगाव (ता. पाथर्डी) येथील ग्रामस्थांनी गावात ग्रामसभा घेऊन संपूर्ण गाव खेडकर कुटुंबाच्या पाठीशी असल्याचा निर्णय जाहीर केला. मनोरमा खेडकर या गावच्या माजी सरपंच होत्या. त्यांच्या काळात गावात विकास कामे झाली. त्यांची सध्या नहाक बदनामी केली जात असून ती थांबविण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या ग्रामसभेत देण्यात आला. गावकऱ्यांनी नगरच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारला यासंबंधी निवेदन दिले आहे. मनोरमा बाईंना ज्या प्रकरणात अटक करण्यात आली ते प्रकरणही खोटे असल्याचा आणि एकच बाजू पुढे आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. गावकरी खेडकर यांनी गावात केलेल्या विकास कामांमुळे समाधानी असून जर सरपंचपद आरक्षित झाले नसते, तर मनोरमा खेडकर यांनाच पुन्हा सरपंचपदाची संधी देण्यात येणार होती, असेही या निवेदनात म्हटले आहे. सगळे काही उलटसुलट घडत असताना गावकरी पाठीशी आहेत, हाच काय तो खेडकर कुटुंबाला दिलासा म्हणता येईल.

---

**लोकनामा**

# 'संविधान हत्या दिना' मागचे गूढ..!



भूपेंद्र गणवीर
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

सेंगोल, मठ, तामिळनाडू, केशवानंद भारती, संविधान हत्या दिन अशा भाजपच्या राजकीय खेळी आहेत. न्यायालयात सीएए, एनआरसी, इलेक्टोरल बाँड खटले प्रलंबित आहेत. त्यावर काय निर्णय येणार याचा अंदाज नाही. सरकार धास्तावलेले आहे.

भाजप आणि संघ भारतीय संविधानाचा सन्मान राखतो काय? या प्रश्नावर त्यांनी आत्मचिंतन करावे. त्यांनाच त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. सरकार प्रायोजित संविधान हत्या दिनाचे औचित्य केवळ आणीबाणीच्या निषेधापुरते नाही. जे वरवर दिसते. पन्नास वर्षांनंतर हत्येसारखा उत्तेजक शब्द कशासाठी..? संविधान दुरुस्ती असेल, तर भाजपच्या काळातही सात दुरुस्त्या झाल्या. राहुल गांधी यांनी संविधान प्रश्नावर भाजपची कोंडी केली त्यासाठी हे प्रयोजन, एवढे साधे कारण निश्चित नाही. इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या काळात ४२ वी घटना दुरुस्ती केली. संविधान (४२ वे संशोधन) अधिनियम- १९७६ आणला. त्यात संविधान उद्देशिकेत समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष या दोन शब्दांचा अंतर्भाव केला. हे दोन शब्द विद्यमान सत्ताधाऱ्यांची मुख्य अडचण आहे. धर्मनिरपेक्ष शब्दाने तर त्यांच्या हिंदूराजचा अजेंडाच रोखला. त्या शब्दात सर्व धर्मांसोबत समान व्यवहार. सरकारने तटस्थ राहावे. कोणत्याही धर्माला झुकते माप देऊ नये. कोणत्या विशेष धर्माचे राजधर्म म्हणून समर्थन करू नये. हा अर्थ आहे. या शब्दाने हिंदूराज या संकल्पनेची हत्या झाली. संविधान काल होते. ते आजही आहे. त्या संविधानाला अहिंसा व करुणेची झालर आहे. संविधानाची शपथ घेऊन सारेजण सत्तेत आले. त्यांनी हत्येसारखा उत्तेजनार्थी शब्द वापरावा. याचा अर्थ धर्मनिरपेक्ष शब्द जिव्हारी लागला असे दिसते. ४०० पारचा नारा उलटल्याने कोंडी झाली. संविधान प्रश्न भावनिक करण्याचा नवा कारस्थानी डाव आहे. आता नवा समाज आहे. त्याला शब्दांच्या पलीकडचे अर्थ कळू लागले. महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांनी समाज जागृत केला. शिक्षणाचे धडे दिले. वैचारिक मानसिकता मजबूत केली. त्यातून हत्या शब्दामागचे राजकारणदेखील कळले. या शब्दामागची सरकारची केविलवाणी धडपड दिसते. या धर्मनिरपेक्षतेचे लाभार्थी धार्मिक व भाषिक दोन्ही प्रकारचे अल्पसंख्याक आहेत. केरळमध्ये काशीचे ब्राह्मण आहेत. ते धार्मिक अल्पसंख्याक म्हणून सर्व लाभ लाटतात, तर महाराष्ट्रात गुजराती भाषिक अल्पसंख्याक आहेत. कर्नाटकात मराठी माणूस भाषिक अल्पसंख्याक आहेत. त्यांना धार्मिक अल्पसंख्याकांसारखेच (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध) लाभ मिळतात. ते लाभ चालतात; मात्र शब्द चालत नाही. संविधानात ते होते. उद्देशिकेत आल्याने ते अधिक स्पष्ट झाले.

दुसरा शब्द समाजवाद आहे. हा शब्द आर्थिक न्यायासाठी आहे. त्यात गरिबी निर्मूलन आहे. त्यासाठी गरिबी हटावचा नारा दिला. बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्या काळात जाती, जमातीच्या युवकांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या दिल्या. पहिल्या पिढीतील सुशिक्षितांना नोकऱ्या दिल्या. गोरगरिबांसाठी कल्याणकारी योजना आणल्या. ती आणीबाणीची देन होय. हे नाकारता येणार नाही. सरकारी उपक्रमांचे खासगीकरण करणाऱ्यांना, भांडवलधार्जिण्यांना समाजवाद कसा चालेल. त्या शब्दाने मूठभरांकडे संपत्ती वळविण्याच्या स्वप्नांची हत्या होत आहे. खासगीकरण ही भ्रष्ट पद्धत आहे. तिच्यावर अंकुश येऊ शकतो. एक टक्का लोकांकडे देशाची सत्तर टक्के संपत्ती एकवटली आहे. दुसरीकडे उपोषण, उपासमार आहे. या विषमतेच्या विरोधात संविधान आहे. सामाजिक न्यायासाठी आरक्षण आहे. सत्ताधाऱ्यांच्या खासगीकरणामुळे ते धोक्यात आले. या चुकीच्या धोरणाबाबत जाब विचारला जाणार. संसदेत संविधानाच्या प्रति वाटल्या. त्या उद्देशिकेतून हे दोन्ही शब्द वगळले. इतकी मुजोरी..! त्याची शिक्षा मतदारांनी दिली. २४० पर्यंत उतरविले. त्यामुळे संविधानाच्या आड सरकारची नवी खेळी आहे.

सेंगोल, मठ, तामिळनाडू, केशवानंद भारती, संविधान हत्या दिन अशा भाजपच्या राजकीय खेळी आहेत. न्यायालयात सीएए, एनआरसी, इलेक्टोरल बाँड खटले प्रलंबित आहेत. त्यावर काय निर्णय येणार याचा अंदाज नाही. सरकार धास्तावलेले आहे. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून ओरिसात जय जगन्नाथ नारा दिला. तामीळनाडूत मठांचे राजकारण मांडले.

भाजप व संघाचे राजकारण धर्मावर आधारित आहे. सेंगोल आणि मठ संबंध जुने आहेत. संसद सभागृहाला मोठा इतिहास आहे. तिथे लोकशाहीची प्रतीके आहेत. त्यापैकीच एक राजदंड आहे. त्या संसदेच्या सभागृहात सेंगोल हे राजेशाही व पुरोहितशाहीचे प्रतीक आणले. लोकसभा अध्यक्षाच्या आसना शेजारी ठेवले. त्याचा उत्सव केला. अन लोकसभेचे कस्टोडियन लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला मूकदर्शक बनून बघत राहिले.

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी कस्टोडियन कोण, असा प्रश्न विचारत अलीकडे वेगळ्या प्रकरणावरून चिमटा काढला. तो योग्यच होता. संविधान हत्या दिनाच्या निमित्ताने मठाधिपती केशवानंद भारती यांच्या उदात्तीकरणाची चाल दिसते. केरळसह काही राज्यांनी सरकारांनी मठाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनी काढून घेतल्या अन त्या कसणाऱ्या शेतकऱ्यांना दिल्या. तरी त्या मठांकडे बऱ्याच जमिनी शिल्लक आहेत. संविधान सन्मानात सेंगोल अजिबात बसत नाही. सेंगोलला ईश्वरीय शक्ती म्हटले जाते. ते राजमुकूटासोबत राजाकडे सोपविले जात होते. त्यामागे तू राजा असला तरी सर्वश्रेष्ठ नाही. धर्म, कायदे सर्वश्रेष्ठ आहेत. त्या नियम, कायद्यांचे संरक्षक राजपुरोहित आहेत. ते नेहमी काशीचे ब्राह्मण असत. त्यांचे प्रतीक सेंगोल. त्या माध्यमातून ते सत्तेवर नियंत्रण ठेवीत असत. त्या काशीचे लोकप्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. ते अनेकदा पुरोहित वेषभूषेत येतात. सोबतीला असली पुरोहित असतात. ते मंत्रोपचार उद्गारत पूजा करवून घेतात. संसदेतील सेंगोल उत्सवात नेमके तेच घडले. संविधान आल्यावर पुरोहितशाही संपली. राजेशाही संपली. भाजपच्या शब्दात पुरोहितशाही, राजेशाहीची हत्या झाली, असे म्हणणे सयुक्तीक ठरेल. त्या जागी लोकशाही आली. तिचा दीपस्तंभ भारतीय संविधान आहे. ती लागू झाली. तिचे आसन १३ न्यायमूर्तींच्या पीठाने दिलेल्या एका निर्णयाने आणखी मजबूत झाले. त्याला कारणीभूत ठरले सेंगोल संस्कृतीचे मठाधिपती केशवानंद भारती हा भाग वेगळा. अलीकडे अघोषित आणीबाणी चालते. कारणाविना अनेकांना जेलमध्ये डांबले जाते. भीमा कोरेगाव प्रकरणी झारखंडचे स्टेन स्वामी यांचा जेलमध्ये मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली वाहण्यास कोणता दिवस साजरा करावा, असे प्रश्न आहेत.

---

**मंथन**

# असली ते असलीच!

डॉ. संतोष नारायण कायंदे
9284234608
skayande09@gmail.com

अठराव्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीला बहुमत मिळाले. महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्षांची कामगिरी महायुतीच्या तुलनेत सरस ठरली. विशेष असे, की उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाला शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पेक्षा जास्त जागा मिळाल्या. या निकालाने हे सिद्ध केले, की मूळ राजकीय पक्ष व चिन्ह यासंबंधी दोन्ही शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक आयोगाने केलेला निर्णय संशयास्पद व चुकीचा होता. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारादरम्यान शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील पक्षाला नकली म्हणून हिणवले होते; परंतु महाराष्ट्रात त्यांनी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा जास्त मते व जागा प्राप्त केल्या. ज्यामुळे त्यांच्या नेतृत्वातील पक्ष हेच असली पक्ष असल्याचे प्रत्ययास आले. शेवटी असली ते असलीच. एखाद्या राजकीय पक्षात फूट पडल्यावर प्रत्येक गट आपल्याकडेच मूळ पक्षाचा वारसा आला असल्याचा दावा करून मूळ पक्षाचे चिन्ह आपल्यालाच मिळावे, अशी मागणी करतो. चिन्ह आदेश १९६८ च्या परिच्छेद १५ अंतर्गत असा वाद सोडविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. मुळात आधी शिवसेना व नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यावर एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी आमचाच पक्ष मूळ राजकीय पक्ष असल्याचा दावा करून मूळ पक्षाचे चिन्ह देण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. निवडणूक आयोगाने आधी १७ फेब्रुवारी २०२३ रोजी शिंदे गटाला मूळ पक्षाचे नाव व चिन्ह-शिवसेना व धनुष्यबाण देण्याचा आणि त्यानंतर ६ फेब्रुवारी २०२४ रोजी अजित पवार गटाला मूळ पक्ष व पक्षाचे चिन्ह- राष्ट्रवादी काँग्रेस व घड्याळ देण्याचा अंतिम निर्णय दिला होता. निवडणूक आयोगाचा हा निर्णय तार्किक आधारावर योग्य वाटत नाही. याचे कारण असे, की आयोगाने वरील निर्णय करताना जी चाचणी वापरली होती तीच मुळात चुकीची व विसंगत होती. आयोगाने विधिमंडळातील बहुमताच्या आधारावर मूळ पक्ष व चिन्हाचा निर्णय केला होता. जेव्हा एखाद्या राजकीय पक्षात फूट पडते तेव्हा संविधानाच्या दहाव्या अनुसूची अंतर्गत फुटीर गटाच्या विधिमंडळ सभासदांच्या अपात्रतेचा प्रश्न निर्माण होतो. शिवसेनेच्या बाबतीत शिंदे गटाच्या १६ सभासदांच्या अपात्रतेसंबंधीचा प्रश्न प्रलंबित असताना विधिमंडळ सभासदांच्या बहुमताच्या आधारे मूळ राजकीय पक्ष व चिन्हाचा निर्णय करणे चुकीचे होते. साधारणपणे अशाप्रकारचा निर्णय करताना तीन प्रकारच्या चाचण्यांचा विचार केला जातो. पहिली मूळ पक्षाची घटना व त्यातील तरतुदींचे विश्लेषण, दुसरी पक्षाचे ध्येय व उद्दिष्टाला अनुसरून कोणता गट आहे हे ठरविणारी मूल्यमापन चाचणी आणि तिसरी विधिमंडळातील आणि पक्षाच्या संघटनेतील बहुमताची चाचणी. सर्वोच्च न्यायालयाने सादिक अली खटल्याच्या वेळी चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अंतर्गत वरील चाचण्या लागू करण्याचा विचार केला होता. निवडणूक आयोगाने आधीच्या एका खटल्यामध्ये वरील तीनही चाचण्यांचा विचार करून निर्णयासाठी तिसऱ्या चाचणीचा उपयोग केला होता. १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात इंदिरा गांधींमुळे फूट पडल्याने निजलिंगप्पा अध्यक्ष असलेली काँग्रेस आणि सी. सुब्रमण्यम अध्यक्ष असलेली काँग्रेस असे दोन गट तयार झाले होते.

वरील दोन्ही गटांनी आपलाच गट खरी काँग्रेस असल्याचा दावा करून जु मानेवर असलेली बैलजोडी हे निवडणूक चिन्ह आपल्याच गटाला मिळावे, अशी मागणी केली होती. निवडणूक आयोगाने निर्णय करताना तिसऱ्या चाचणीचा उपयोग करून विधीमंडळातील आणि पक्षाच्या संघटनेतील बहुमताच्या आधारावर इंदिरा गांधी यांच्या गटाला (काँग्रेस जे- पहिले अध्यक्ष सुब्रमण्यम होते नंतर त्यांच्या जागी जगजीवनराम अध्यक्ष झाले होते.) पक्षाचे बैलजोडी हे चिन्ह दिले होते, तर निजलिंगप्पा अध्यक्ष असलेल्या पक्षाला चरखा चालवणारी स्त्री हे निवडणूक चिन्ह दिले होते. सध्याच्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत हीच चाचणी लावली असली, तरी ती लावताना फक्त विधिमंडळातील बहुमताचाच विचार केला गेला आणि पक्षाच्या संघटनेतील बहुमताकडे दुर्लक्ष केले. शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेमध्ये सर्वात वरच्या पातळीवर असलेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये ठाकरे गटाचे बहुमत होते. शिवसेना पक्षप्रमुखासह एकूण १४ सभासदांचा राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये समावेश होता. १४ पैकी दहा सभासद ठाकरे गटाचे आणि फक्त चार सभासद शिंदे गटाचे होते. कार्यकारिणीतील १४ सभासदांपैकी नऊ सभासदांची निवड केली होती आणि पक्षप्रमुखांनी पक्षाच्या घटनेला अनुसरून त्यांच्या अधिकारांतर्गत चार सभासदांची नियुक्ती केली होती. निवडून आलेल्या नऊ सभासदांपैकी रामदास कदम व गजानन कीर्तिकर हे दोन आणि नियुक्त चार सभासदांपैकी एकनाथ शिंदे व आनंदराव अडसूळ हे दोन सभासद शिंदे गटाचे होते. उर्वरित सर्व दहा सभासद हे ठाकरे गटाचे होते. राष्ट्रवादीच्या बाबतीतसुद्धा हीच स्थिती होती. आयोगाने वरील दोन्ही पक्षांच्या बाबतीत संघटनात्मक पातळीवरील बहुमताचा विचार केला नाही. वास्तविक कोणत्याही राजकीय पक्षासंबंधी असा प्रश्न निर्माण झाल्यास निवडणूक आयोगाने त्यासंबंधीची वस्तुस्थिती लक्षात घेऊन योग्य व सुसंगत अशी चाचणी वापरली पाहिजे. असे न करता निर्णय करणे संसदीय लोकशाहीसाठी चांगला संकेत नाही. संसदीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षाचे स्थान महत्त्वाचे असते. राजकीय पक्षाची काही विशिष्ट तत्त्वे व मूल्ये असतात. पक्षाची स्वतःची विचारसरणी व शिस्त असते. मूळ राजकीय पक्ष हा विधीमंडळ पक्षाच्या तुलनेत अधिक महत्त्वाचा असतो. मूळ राजकीय पक्ष स्थायी, तर विधीमंडळ पक्ष अस्थायी स्वरूपाचा असतो. विधिमंडळातील प्रतोद व पक्ष नेत्याची नियुक्ती करण्याचा अधिकार मूळ राजकीय पक्षाला असतो. मूळ राजकीय पक्षाचे नियंत्रण विधीमंडळ पक्षावर असते. जेव्हा मूळ राजकीय पक्ष व त्याच्या चिन्हासंबंधी विवाद निर्माण होतो तेव्हा सांविधानिक व स्वायत्त असलेल्या निवडणूक आयोगाने आपल्या यासंबंधी असलेल्या सांविधानिक जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे. आयोगाने कोणत्याही प्रकारे राजकीय अभिनिवेश न ठेवता निःपक्ष व पारदर्शी निर्णय करून संसदीय लोकशाहीला बळकट करण्याची खरी गरज आहे.

(लेखक श्री शिवाजी महाविद्यालय, अकोट, येथे प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख आहेत.)

---

**वर्तमान**

# ...यावरून आपले 'कारभारी' सुधारतील?

प्रदीप व्ही. खोलमकर
8767592980
pradeepkholamkar9@gmail.com

५ नोव्हेंबरला अमेरिकेत अध्यक्षीय निवडणूक होत आहे. त्यामुळे तेथे प्रचाराचे वारे वाहत आहेत. अशातच, ५ दिवसांपूर्वी अमेरिकेतील पेनसिल्व्हेनियात संध्याकाळी ६.१० वाजता (भारतीय वेळेनुसार रविवारी पहाटे ३.४०) माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर थॉमस मॅथ्यू क्रुक्स या २० वर्षीय तरुणाने गोळी झाडून, त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प यांचे नशीब बलवत्तर म्हणून, 'जीवावरचे कानावर निभावले'. गोळी कानाला चाटून गेल्यामुळे ते या हल्ल्यातून बालंबाल वाचले. एकाच क्षणात स्नायपरने थॉमसला गोळी घालून ठार केले.

ट्रम्प हे रॅलीला संबोधित करत होते. अचानक झालेल्या या हल्ल्याने रॅलीत चांगलीच खळबळ उडाली. विशेष म्हणजे, हल्लेखोर हा त्यांच्याच रिपब्लिकन पक्षाचा नोंदणीकृत मतदार होता. त्याने काही महिन्यांपूर्वी पक्षाला १५० डॉलर्सची देणगीही दिली होती. ट्रम्प यांना अध्यक्षीय स्तरावरील सुरक्षा असूनही हा हल्ला झाला. सुरक्षेच्या प्रोटोकॉलचे काटेकोरपणे पालन करण्यात आले नाही, हे २५ ऐवजी फक्त ६ सिक्रेट सर्व्हिस एजंट उपस्थित असल्याने सिद्ध होते. हल्ल्याचे नेमके कारण काय? याची चौकशी सुरू असून काही दिवसांत याची माहिती समोर येईलच.

निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर झालेल्या या हल्ल्याने अमेरिकेसह संपूर्ण जग हादरले आहे. देशातील लोकशाहीला राजकीय हिंसाचारामुळे निर्माण झालेल्या धोक्याचा हा गंभीर इशारा असल्याचे अमेरिकन प्रसारमाध्यमांनी म्हटले आहे. अमेरिकेला फार वर्षांपासूनची हिंसक कृत्याची परंपरा आहे. परंतु, दुर्दैवाने अलीकडे अशा घटनांत वाढ होत असल्याची चिंताजनक परिस्थिती आहे.

अलीकडे राजकारणाला केवळ पैसा कमविण्याचे साधन समजून, त्याला व्यवसायाचे स्वरूप दिले गेले आहे. त्यामुळे सत्तेचा मार्ग हा गुन्हेगारी, हिंसाचार, रक्तपात, अपप्रचार यांमधूनच जातो. राजकीय नेत्यांची कडवट भाषणे आणि खोटा अपप्रचार यामुळे स्फोटक, हिंसक वातावरण निर्मिती होते; आणि त्यातून अशा दुर्दैवी घटना घडतात, असे मत अनेक राजकीय विश्लेषक, अभ्यासक व तज्ज्ञांनी नोंदविले आहे. ते अगदी बरोबर आणि पटणारेही आहे.

सर्वात मोठी आणि बलशाली लोकशाही असलेल्या भारत देशाची, आणि विशेषतः महाराष्ट्राच्या राजकारणाची आजची परिस्थिती वर्णन करण्यासाठी शब्दच सूचत नाहीत, इतक्या नीच स्तरावर काही नेत्यांनी ते नेऊन ठेवले आहे. यांची भाषणे, प्रतिक्रिया या कडवट नव्हे, तर गलिच्छ, अश्लील (अक्षरशः म्यूट आणि फुल्यांचा वापर करावा लागणाऱ्या) आणि 'पायाची आग मस्तकात' पोहोचवणाऱ्या असतात. त्यात 'विषारी आणि विखारी'पणा ठासून भरलेला असतो, हे आपण सर्वजण रोज बघत आणि ऐकत असतोच. सध्या महाराष्ट्राचे राजकारण 'मराठा आरक्षण आंदोलना'ने ढवळून निघाले आहे. दुर्दैवाने, आता त्याचा वापर अतिशय घाणेरड्या राजकारणासाठी केला जात आहे. हे फक्त 'आंदोलन'च नव्हे तर, एक 'षड्यंत्र' रचले गेल्याचे; आणि त्यातील 'खलनायक', तसेच विधानसभा निवडणुकीपर्यंत ते ताणून नेण्याचा 'इरादा'ही आता हळूहळू उघडा पडत आहे. मराठा, ओबीसी यांच्यात संघर्ष पेटवून तर दिलाच आहे. पण, आता इतर जातींनाही फूस लावून 'जातीयवादा'चे राजकारण खेळले जात असल्याचे जाणवत आहे.

एकूणच, येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राज्यात स्फोटक आणि असंतोषाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काही नेत्यांकडून केला जात आहे, तो अत्यंत गंभीर आणि धोकादायक ठरणार आहे, हे नक्की. अमेरिकेतील घटना डोळ्यासमोर ठेवून, किमान आता तरी काही विद्वान 'वाचाळविरांनी' आपल्या जिभांना लगाम घालणे आवश्यक आहे. अन्यथा, घडू नये पण, दुर्दैवाने अशी घटना आपल्याकडेही घडू शकते. तसेच प्रत्येकवेळी कानावरच निभावेल, असेही नाही. या घटनेतून आपले 'कारभारी' शहाणे होऊन सुधारतील, असे समजू या.

नाशिक

---

**वाचक विचार मंच**

## राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह!

दारूच्या प्रभावाखाली वाहन चालवणे हा भारतामध्ये गंभीर गुन्हा असताना नुकतेच देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या वरळीत एका राजकीय पक्षाच्या उपनेत्याच्या मुलाने दारू ढोसून आपल्या आलिशान बीएमडब्ल्यू कारने एका महिलेला उडविले आहे. या घडलेल्या हिट अँड रनच्या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. प्रदीप नाखवांचा आक्रोश अजूनही मनातून जात नाहीय. खांद्याला खांदा लावून संसाराचा गाडा हाकणारी सहचारिणी जगातून कायमची निघून गेली आणि संपूर्ण नाखवा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या घरातल्या दोन लेकरांची आई काळाच्या पडद्याआड गेली. कावेरी नाखवा यांच्या आयुष्याची दोरी बड्या बापाची औलाद असणाऱ्या मिहिर शाहने अशी कापली की, कुणाच्याही तळपायाची आग मस्तकात जाईल. मिहिर शाहने दारूच्या नशेत केलेले हे कृत्य फक्त कायद्याला पायदळी तुडवणारेच नव्हते, तर ते मानवता आणि नैतिकतेचाही मुडदा पाडणारे होते. सुमारे दोन किलो मीटरपर्यंत कावेरी नाखवा यांना फरफटत नेले होते. या हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनेमुळे पुन्हा एकदा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका राजकीय पक्षाच्या वरदहस्तामुळे मिहीर शाह माझे कुणीच काही वाकडे करणार नाही, अशा आविर्भावात वागत होता. आपला आरोप ड्रायव्हरच्या नावावर टाकण्याच्या प्रयत्नात असताना त्याला अटक झाली. त्याला अशी शिक्षा व्हायला हवी की, बड्या बापाच्या अशा औलादी पुन्हा दारू ढोसून असे कृत्य करायला धजावणार नाहीत!

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

---

**गुल्लेर**

## घे घास दे बुक्की



नरेंद्र इंगळे
9561226572

'हॅलो.. काय चाललं बाप्पू? आवाज वयखला नाही काय? तुमचा मेव्हना बोलतो.'

'तेजराव व्हय काय? लय दिवसानं फोन केला रे? काय म्हनते पिकपानी?'

'मस्त हाय यंदा.. डवऱ्याचे फेर झाले..'

'आमच्या भागात पानी सुचू देत नाही.. रोजचं पानी सुरू आहे.'

'बाई काय म्हनते?'

'ते गेली लाडकी बईनचे कागदपत्र जमा कऱ्याले..'

'अरे आता लाडका भाऊ सुरू झालं म्हनतात? फारम भरुन टाक.'

'त्याचं काही खरं आहे काय? इलेक्शनपुरता गाजावाजा सुरु आहे. कागदपत्र जमा करून भरालेच दोन मयने लागतात. तेदरोक इलेक्शन बोकांडीवर येते. आचारसंहिता लागली की अमृत जेवा.'

'फारम भराले काही हरकत आहे काय? खर्चापान्याले पैसे कामी पडतात.'

'आता नोकऱ्या सोडून तुकडे फेकनं सुरू झालं बाप्पू.. बायको आल्यावर काय होते सात- आठ हजारात? या मयन्यात मले पाच हजार इलक्टरी बीलच आलं.'

'अबे काही नसल्यापेक्षा बरं नाही काय? फुकट पैसे येऊन राह्यले घरात.'

'सरकार कुठून देईन एवढा पैसा? आगुदरच महाराष्ट्रावर साडेतीन लाख कोटीचं कर्ज आहे.'

'त्याचा इचार तू कायले करून राह्यला? अमेरिकेतून अदीक कर्ज घेईल.'

'आता अमेरिका भारताले उभंही करत नाही. सरकार व्याजातच बेदम होऊन राह्यलं.'

'इतका लंबा इचार करु नको. फायदा करून घे.'

'मले काही फायदा नाही त्याचा. ते योजना पस्तीस वर्षाच्या अंदर आहे. मी छत्तीसचा झालो.'

'मंग तुह्यासाठी लाडका मेव्हना योजना सुरू होईन. एकनाथभाऊले साऱ्याईची कायजी आहे.. लाडकी सायी.. लाडका मेव्हना.. लाडके आबा.. लाडकी आजी.. एकएक करता सगळयाचा फायदा होईल.'

'लबाडाचं आवतन जेवल्यावर खरं असते.. आजून लाडकी बहिनची साईट सुरू झाली नाही.'

'दम धरा.. सगळं होते.. घे घास दे बुक्की जमत असते काय?'

'तुमच्यासाठी काही योजना नाही काय बाप्पू?'

'आमच्यासाठी लाडका जवाई योजना सुरू होईन..आशा ठेवत जाय.'

---

**जयजयकार**

आधी थोडी वादावादी
नंतर होतात वाटाघाटी
ह्या सर्व घडामोडी
होतात सत्तेसाठी

एकाची कनात
तर दुसऱ्याचा बांबू
तिसऱ्याच्या टेकूने
उभा राहतो तंबू

बेरीज अन् वजाबाकी
गुणाकारासंगे भागाकार
ज्याचा झाला विजय
करा त्याचा जयजयकार

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

---

**जग भ्रमंती**

## २० वर्षांपूर्वी झाले होते सर्वात महागडे लग्न

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या विवाहसोहळ्याची चर्चा अजूनही थांबत नाहीए. या शाही सोहळ्यासाठी अनेक दिवसांपासून तयारी सुरू होती. बऱ्याच दिवसांपासून लग्नाशी संबंधित विविध कार्यक्रम झाले आणि आता विवाह सोहळाही पार पडला. सोशल मीडियावर तर या लग्नाची चर्चा आजही सुरू आहे. खासकरून या लग्नाच्या खर्चाबद्दल अनेकांना उत्सुकता आहे; पण तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल, की या लग्नापेक्षाही महागडे लग्न यापूर्वी झाले आहे. विशेष म्हणजे, जगातील सर्वात महागड्या लग्नाचा विक्रमही एका भारतीयाच्या नावावर आहे.

आतापर्यंत जगभरात अनेक महागडे लग्नसोहळे झाले आहेत. काही रिपोर्ट्सनुसार, प्रिन्स चार्ल्स आणि डायनाच्या लग्नाला जगातील सर्वात महागडे लग्न म्हटले जाते. या लग्नात ११० मिलियन डॉलर्स खर्च झाल्याचे सांगण्यात येते. याशिवाय, काही रिपोर्ट्समध्ये, रशियाच्या सैद गुत्सेरिव्ह आणि खादिजा उझाखोव्ह यांच्या लग्नाला जगातील सर्वात महागडे लग्न म्हटले जाते; पण अधिकृत घोषणा आणि लग्नावर झालेल्या एकूण खर्चाची अधिकृत माहिती नसल्याने जगातील सर्वात महागडे लग्न कोणते, हे स्पष्टपणे सांगता येत नाही. अशा परिस्थितीत जगातील सर्वात महागडे लग्न कोणते असा प्रश्न पडतो.

गिनीज बुक रेकॉर्डद्वारे जाणून घेऊ, की कोणत्या लग्नाला सर्वात जास्त खर्च आला? गिनीज बुकनुसार, जगातील सर्वात महागडे लग्न एका भारतीयाने केले आहे. जगातील सर्वात महागड्या लग्नाचा विक्रम स्टील किंग लक्ष्मी निवास मित्तल यांची मुलगी, वनिषा मित्तल हिच्या नावावर आहे. वनिषा मित्तलने २००४ मध्ये इन्व्हेस्टमेंट बँकर अमित भाटियाशी लग्न केले होते. हा विवाह फ्रान्समध्ये झाला होता.

गिनीज बुकनुसार, लक्ष्मी निवास मित्तल यांच्या मुलीच्या लग्नाचे कार्यक्रम ६ दिवस चालले. या लग्नाची खास गोष्ट म्हणजे हा विवाहसोहळा पॅलेस ऑफ व्हर्सायमध्ये आयोजित करण्यात आला होता. आजपर्यंत या पॅलेसमध्ये आयोजित केलेला हा एकमेव खासगी कार्यक्रम असल्याचे सांगितले जाते. या लग्नात अनेक परदेशी आणि बॉलिवूड सेलिब्रिटींनी परफॉर्म केले. रिपोर्टनुसार, या लग्नात ५५ मिलियन डॉलर्स खर्च करण्यात आले होते. भारतीय चलनात सांगायचे झाले तर, त्या लग्नावर सुमारे ४५० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. आज तुम्हाला ही रक्कम फार वाटत नसेल; पण २० वर्षांपूर्वी ही रक्कम खूप जास्त होती.

# सरकारला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील!

- आरटीईचा अध्यादेश हायकोर्टाकडून रद्द!
- उच्च न्यायालाच राज्य सरकारला मोठा दणका
- विद्यार्थ्यांची लूट होणार नाही याची काळजी घ्यावी
- आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांची माहिती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया सरकारकडून राबवली जाते. मात्र यंदा राज्य शासनानं आरटीईच्या नियमात काही बदल करत त्याबाबतचा नियमबाह्य अध्यादेश फ ब्रुवारीत काढण्यात आला होता.मात्र हा अध्यादेश मुंबई हायकोर्टाकडून रद्द करत राज्य सरकारला दणका दिला आहे.

शालेय प्रवेशाबाबत अचानक अशाप्रकारे निर्णय घेणं घटनाबाह्य असल्याचं हायकोर्टानं म्हणत राज्य सरकारला फटकारलं आहे. खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई प्रवेश प्रक्रियेतून वगळण्याबाबत ९ फ ब्रुवारीला राज्य सरकारनं जारी केलेल्या अधिसूचनेला हायकोर्टाने स्थगिती दिली होती. राज्य सरकारनं खासगी शाळांऐवजी वंचित घटकांतील मुलांना सरकारी अनुदानित शाळेत प्रवेश घ्यावा यासाठी नियमांत बदल केले होते. हा अध्यादेश गोरगरीब , वंचित आणि आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना श्रीमंताच्या मुलांसोबत शिक्षण घेण्या पासून वंचित ठेवणारा होता. आणि तो केवळ आणि केवळ संस्थाचालकांच्या हित जपणारा होता.

सरकारच्या या निर्णयाविरोधात पालक, सामाजिक कार्यकर्ते , शिक्षण प्रेमी आणि विविध संघटनांनी हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मे महिन्यात या अध्यादेशाला स्थगिती देत हायकोर्टानं या प्रकरणावर सुनावणी घेतली होती. त्यात

पान २ वर...

## आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची आर्थिक लूट

सर्वप्रथम आम्ही न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत करतो, आता ही प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करून गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. आधीच न्यायालयीन प्रक्रियेमुळे खूप उशीर झाला आहे. त्याच बरोबर आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांच्या पालकांची शाळांकडून अडवणूक केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच काही शाळा आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकडून संगणक सुविधा, पाणी, खेळाचे मैदान, प्रवेश अर्ज इत्यादी नावाखाली अडवणूक करून पैसे उकळत आहेत. यांच्यावर शिक्षण अधिकारी यांनी कडक कारवाई करत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.



### आरटीई प्रवेशासाठी रिक्त जागा

| तालुके | शाळा | प्रवेश |
| --- | --- | --- |
| अंबाजोगाई | ४१ | २४९ |
| आष्टी | १८ | ८९ |
| बीड | २० | २०० |
| धारुर | ०९ | ७० |
| गेवराई | ३८ | ३२१ |
| केज | २२ | २६७ |
| माजलगांव | २९ | २१५ |
| परळी | २५ | २४७ |
| पाटोदा | ०४ | १७ |
| शिरुर | ०८ | ७७ |
| बीड शहर | २६ | ३४५ |
| वडवणी | ०८ | ५३ |
| एकूण | २४९ | २१४९ |

# मारहाण केल्याच्या आरोपातून निर्दोष

अ‍ॅड.शेख इम्रान खाजा : न्यायालयात मांडला प्रभावी युक्तिवाद



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहेंशावली दर्गा बीड येथे फिर्यादीच्या राहत्या घरी आरोपींनी फिर्यादीस अपशब्द वापरुन व लाथा-बुक्क्याने मारहाण व शिवीगाळ करुन विनयभंग केल्याची तक्रार पेठ बीड पोलीस स्टेशन, बीड येथे फिर्यादीच्या वतीने देण्यात आली होती त्या फिर्यादीवरुन आरोपींविरोधात भा.दं.वि.चे कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा क्र.८९/२०१८ नोंदविण्यात आला होता. सदरील आरोपींची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी बीड यांनी दि.०९ जुलै २०२४ रोजी सबळ पुराव्या अभावी निर्दो ष मुक्तता केली या वेळी अ‍ॅड. शेख इम्रान खाजा यांनी यांनी आरोपीच्या वतीने काम पाहिले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीड शहरातील शहेंशावली दर्गा परिसरात राहणार्या फिर्यादीस याच परिसरातील आरोपींनी शिवीगाळ व मारहाण करुन विनयभंग केला अशी तक्रार पेठ बीड पोलीस स्टेशन येथे दि.१६ मार्च २०२४ रोजी देण्यात आली होती. त्यावरुन आरोपींविरोधात भा.दं.वि.चे कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा क्र.८९/२०१८ नोंदविण्यात आला होता. सदरचे प्रकरण मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होवून सदरचे प्रकरण चालवण्यात आले. या प्रकरणात एकूण ०४ साक्षीदार सरकारी पक्षाच्या वतीने तपासण्यात आले परंतू सबळ पुराव्या अभावी आरोपींना मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी बीड यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. यावेळी आरोपी क्र.४ यांच्यामार्फत अ‍ॅड.शेख इम्रान खाजा यांनी न्यायालयीन कामकाम पाहिले त्यांना अ‍ॅड.पंकज रायभोळे, अ‍ॅड. शेख अन्वर, अ‍ॅड.सुर्यकांत पवार यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अज्ञात वाहनाने दोघांना चिरडले!

दुःखद : पारनेर फाटा येथील घटना

जरंडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

घर साहित्य घेऊन जातांना रस्त्याच्या वाहनातील साहित्याची बांधलेली दोर पुन्हा बांधताना नगर कडून भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने दोघांना चिरडून झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे पाच वाजता नगर - ,पुणे रस्त्यावर सुपे गावाजवळ पारनेर फाट्यावर घडली आहे

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील डॉ गणेश गुणवंत पवार(वय ३९) राहुल लिंबाजी राठोड(२७) हे छोटा हत्ती वाहन क्र-एम एच-१९ सी एक्स -०४२४ यामध्ये घर साहित्य पुण्याकडे घेऊन जात असताना सुपे गावाजवळ पारनेर फाट्यावर लघु शंके साठी थांबून वाहना जवळ येऊन वाहनातील घर साहित्याची बांधलेली दोरी ढिली झाल्या चे पाहून त्या दोरीला पुन्हा बांधण्यासाठी वाहना




जवळ उभे राहून बांधत असताना नगर कडून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने या दोघांना चिरडून वाहन घेवून चालक फरारी झाला आहे दरम्यान सुपे पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई दिनेश मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेवुन पंचनामा करून मृत डॉ गणेश गुणवंत पवार यास तातडीने उपचारासाठी पारनेर

पान २ वर...

# चोरटा दोन पिकअपसह ताब्यात!

तत्परता : केज पोलीसांची धडाकेबाज कारवाई

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलीस स्टेशन केज येथे गुरनं. ३८७/२०२४ कलम ३०३ बीएनएस व गुरनं. ३९४/२०२४ कलम ३७९ प्रमाणे पिकअप चोरीचे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हे दाखल होते. पोलीस स्टेशन केज व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज येथील कर्मचारी हे नमुद गुन्हयात चोरी गेलेले दोन पिक अप चा शोध घेत असतांना त्यांना यांनी गुप्त बातमीदारां मार्फत माहिती मिळाली की सदर गुन्हयातील चोरी गेलेले पिकअप हे लातुर जिल्हयात असल्याची माहिती मिळाल्यावरुन मा. सहा. पोलीस अधीक्षक कमलेश मीना व पोलीस निरीक्ष प्रशांत महाजन पोलीस स्टेशन केज यांचे मार्गदर्शनाखाली पथक तयार करुन आरोपीचे शोध कामी रवाना केले होते. सदर पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्हयातील आरोपीतास लातुर जिल्हयातील




रेणापुर येथुन सदर गुन्हयातील आरोपी नामे मुसेफ अब्दुल रहिम कुरेशी, वय १९ वर्षे, रा. सराई गल्ली बसवेश्वर चौक, रेणापुर ता, रेणापुर जि.लातूर यास ताब्यात घेवुन सदर आरोपीताकडुन सदर गुन्हयात चोरीस गेलेले टाटा कंपनीचे ४,५०,०००/-रुपये किंमतीचे व महेंद्रा कंपनीचे २,०००००/- रुपये किंमतीचे पिकअप जप्त केले आहे. असा ऐकणु ६,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पान २ वर...

# सुटीच्या दिवशी धान्याचा झाला पुरवठा

चर्चा : नेमकं चाललंय तरी काय?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

१७ जुलै रोजी आषाढी एकादशी व मोहरमची शासनमान्य सुटी असतानाही पुरवठादाराने पोषण आहार मालाचे वाटप केल्याने केज तालुक्यातील सेविका, कार्यकर्त्या, मदतनीसांची धावपळ होऊन तारांबळ झाल्याचे दिसून आले. १७ रोजी केज तालुका अंतर्गत अंगणवाडी केंद्र चालू आहेत, या अंगणवाड्यांना शासनामार्फत बालकांना व गरोदर माता आणि किशोरवयीन मुलींना दरमहा पोषण आहार पुरवठा शासनामार्फत केला जातो. पुरवठादाराला नेहमी

पान २ वर...

> संबंधित ठेकेदारास उद्याच लेखी नोटीस काढली जाईल. यापुढे अंगणवाडी केंद्रांना सुटीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळेतच माल पुरवठा केला जाईल. -चंद्रशेखर केकान,
> उपमुख्य कार्यकारी अधिकारी

# डॉ.आंबेडकर स्मारकाचे काम प्रगतीवर

दिलासा :आ.संग्राम जगताप घेतात कामाचा आढावा

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अ नगर शहरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा अनेक वर्षांच्या लढ्यानंतर उभे राहत असुन हा पुतळा सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या नंतर त्या पुतळ्याची प्रतिकुती नगर शहरात उभारण्यात येत आहे या पुतळ्याच्या चबुतराची उंची १८फुट असुन पुतळा १०फुटाचा आहे एकुण २८फुटाचा भव्यदिव्य पुतळा असणार आहे ६ महिन्यात ह्या स्मारकाचे काम पुर्ण करण्यात येणार आहे या स्मारकाचे काम प्रगतीपथावर असून नगर शहराचे कार्यकुशल आमदार संग्राम भैय्या जगताप हे या कामाचा आढावा घेत असुन काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सुचना करत आहे आंबेडकरी चळवळीतील सुरेश भाऊ बनसोडे अजय साळवे सुमेध गायकवाड नगरसेवक प्रशांत गायकवाड नगरसेवक राहुल कांबळे सुनील क्षेत्रे



विजय भांबळ किरण दाभाडे योगेश साठे योगेश थोरात बंडु आव्हाड आदी सह डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा कुती समिति लक्ष ठेवून आहेत

सदरील पुतळा हा महामार्ग वरील रस्त्यावर येत असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या ना दिसणार आहे त्या मुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न प्रशासन करत आहे त्यामुळे आंबेडकरी अनुयायी मध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# बीडमध्ये होतेय रुग्णांचे आर्थिक शोषण

निवेदन : मनसेची बडेंकडे लेखी तक्रार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील प्रायवेट हॉस्पीटलमध्ये व स्वतंत्र पॅथॉलॉजी लॅबमध्ये तपासण्यासाठी मनमानी करुन अव्वाच्या-सव्वा टलमध्ये आमच्याकडेच तपासण्या करा नाहीतर बाहेरचे रिपोर्ट ग्राह्य धरले जाणार नाहीत अशा प्रकारे रुग्णाच्या मनाविरुद्ध तपासण्या करण्यास प्रवृत्त करायला लावतात यामुळे खासगी डॉक्टर आणि लॅब असोसिएशन यांना आपल्या स्तरावरुन कार्यवाही करा अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष करण लोंढे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषीकेश गिराम पाटील यांचय वतीने देण्यात आला आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यात सुरु असलेल्या प्रायव्हेट हॉस्पीटलमधील पॅथॉलॉजी लॅब चालक व तेथील डॉक्टरांशी संगनमत करुन पेशंटकडून मनमानी किंमतीमध्ये तपासण्या करुन नागरिकांची सर्रास लुट होत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे आलेल्या तक्रारीवरुन ही लुट थांबवण्यासाठी संबंधीत अधिकार्यांशी एक टीम तयार करुन सर्व पॅथॉलॉजी लॅबचा आढावा घेवून संबंधित लॅब चालक आवश्यक प्रमाणपत्र न घेता लॅब चालवत आहे का व त्या लॅबचालकाची लॅब चालवण्याची पात्रता व

पान २ वर...

संतोष नारायणकर | कॉ.बापूसाहेब देशमुख स्मृतिदिन

# आई-वडील अन् शिक्षक संस्काराची खाण!

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनौ पावलोपावली संघर्ष आहे संघर्षाची तयारी ठेवा, अपयशाने खचून जाऊ नका सातत्याने संघर्ष करा यश नक्कीच मिळेल असे मार्मिक मार्गदर्शन करत महाराष्ट्र विद्यालय मोहा ही शाळा नसती तर आज बळीराम पवार हे जिल्हाधिकारी न होता ऊसतोड कामगार म्हणून जीवन जगला असता असे शाळेबद्दल गौरव उद्गार माजी आयुक्त बळीराम पवार यांनी केले तर आपले आई-वडील आणि शिक्षक ही संस्कारची खाण असून बालवयात मिळालेले संस्कार हेच पुढील आयुष्यभर आपली ओळख निर्माण करतात असे प्रतिपादन बालकवी संतोष नारायणकर यांनी केले.

परळी तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा चे संस्थापक संचालक



कॉ.बापूसाहेब देशमुख यांच्या २२ व्या स्मृती निमित्य स्मृती व्याखानमाला व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा शुक्रवार दि १९ रोजी महाराष्ट्र विद्यालयात संपन्न झाला.या प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून तर संस्थेचे जेष्ठ संचालक सुदाम देशमुख, सचिव एड.अजय बुरांडे, संचालक सुदाम शिंदे, मुख्याध्यापक मूरलीधर बोराडे,गणपत कोकाटे, संभाजी देशमुख आदी विचार मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना पवार म्हणाले की, आळशी लोकांचा मराठवाडा अशी राज्यभर असलेली ओळख आजच्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या गुणवत्तेच्या आधारे मोडून काढावी. शिक्षण केवळ नौकरी मिळविण्यासाठी न घेता देशाचा एक आदर्श नागरिक बनण्यासाठी घ्यावे.विद्यार्थ्यांनी मनाने आणि शरीराने खंबीर बनत जीवनात सातत्याने संघर्ष करत यश मिळवावे असे सांगितले तर दुसरे प्रमुख अतिथी बालकवी नारायणकर यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थाचे मनोरंजन करीत प्रबोधन करण्याचे काम केले. विद्यमान परिस्थितीवर प्रकाश टाकणारी अशीच एकदा विचारली होती त्यांनी माझी

पान २ वर...

# वीज कर्मचारी पतसंस्थेची निवड

अभिनंदनिय :सचिवपदी मुंडे यांची बिनविरोध निवड



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्रातील राष्ट्रीय वीज कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सचिवपदी गणेश मुंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. परळी वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्रातील राष्ट्रीय वीज कर्मचारी सहकारी पतसंस्था मराठवाड्यातील अग्रगण्य संस्था असून, अनेक वर्षापासून वर्ग अ दर्जा मिळविणारी संस्था आहे. या राष्ट्रीय वीज कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या पदावर कार्यरत संचालक मंडळातून उर्वरित कालावधीसाठी उपाध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष पदासाठी निवडणूक पार पडली सदर निवडणूक ही बिनविरोध झाली. यामध्ये राष्ट्रीय वीज कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सचिवपदी गणेश महादेव मुंडे, उपाध्यक्ष अशोक मुंडे, कोषाध्यक्षा ज्योती फड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा व्यवस्थापक वित्त व लेखा अधिकारी वैजनाथ कराड, स्वप्निल परळीकर, भगवान साकसमुद्रे आदींनी सत्कार केला.